POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

उप संपादिका : सौ. प्रीती दिपक नाईक   कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-३०२ ● मुंबई, मंगळवार, ०३ जून २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA



महाराष्ट्राची सत्ता हातात असलेल्या महायुतीत वाद सुरु आहे. हा वाद आता चव्हाट्यावर आला आहे. राष्ट्रवादी सोबत नको अशी जाहीर भूमिका शिवसेनेच्या नेत्यांनी मांडली आहे.

## महाराष्ट्राच्या महायुतीत महावाद!

### अजित पवारांची राष्ट्रवादी सबोत नकोच... कोण आणि का म्हणतयं असं?

**■मुंबई I प्रतिनिधी :**

महाराष्ट्रातील सर्वच पक्ष आता स्थानिक स्वराज्य निवडणुकांच्या तयारीला लागले आहेत. अशातच महाराष्ट्राची सत्ता हातात असलेल्या महायुतीत महवाद निर्माण झाला आहे. रायगडमध्ये महायुतीत बिघाडी होण्याची शक्यता आहे. कोकणातील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत राष्ट्रवादीला बाजू ठेवणार असे स्पष्ट संकेत रोहयो मंत्री भरत गोगावले यांनी दिलेत. त्यामुळे महायुतीत वाद निर्माण होण्याची चिन्ह आहेत.

राज्यात लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचं बिगुल वाजणार आहे. या पार्श्वभूमीवर प्रत्येक पक्षानं आपली रंगीत तालीम सुरू केलीय. दरम्यान या निवडणुकींच्या पार्श्वभूमीवर रायगडमध्ये महायुतीत बिघाडी होण्याची दाट शक्यता आहे.. कारण आगामी निवडणुकीत रायगडमध्ये राष्ट्रवादीला बाजूला ठेवणार असल्याचं भरत गोगावले यांनी म्हटलंय. महायुती म्हणून नव्हे तर युती म्हणून कामाला लागा असे आदेश गोगावलेंनी कार्यकर्त्यांना दिले आहेत.

महेंद्र दळवी यांनी देखील भरत गोगावलेंच्या वक्तव्याला दुजोरा दिलाय, आगामी निवडणुकीत राष्ट्रवादीला बाजूला ठेवायचंय असं विधान त्यांनी केलं. तर, रायगडमध्ये राष्ट्रवादीसोबत युती नाही असं वक्तव्य शिवसेना आमदार महेंद्र दळवी यांनी केलंय.. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकाच नव्हे तर पालकमंत्रिपदावरून देखील शिवसेना आक्रमक झाली आहे. रायगडचं पालकमंत्रिपद भरत गोगावलेंनाच मिळायला हवं, आम्हाला दुसरा कुठलाही पालकमंत्री चालणार नसल्याचा इशारा योगेश कदम यांनी दिला. तर, पालकमंत्रिपदाचा तिढा मुख्यमंत्री सोडणावर असल्याचं बावनकुळेंनी म्हटल आहे. रायगडमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वादाची चिन्ह आहेत. कारण आधीच रायगडमधल्या पालकमंत्रिपदावर तोडगा निघालेला नाही.. आणि त्यात आता गोगावलेंनी केलेल्या वक्तव्यामुळे राष्ट्रवादी आणि शिवसेनेमधला वाद आणखीनच वाढण्याची शक्यता आहे.

दरम्यान, राज्यातील रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांसाठी ४ आठवड्यांमध्ये प्रक्रिया सुरू करण्याच्या सुप्रीम कोटार्ने आदेश दिले होते. त्यानुसार आता राज्य निवडणूक आयोगाने पावले टाकण्यास सुरुवात केली आहे.. आयोगाकडून प्रभाग रचनेसाठी राज्य सरकारला सूचना केली आहे.. राज्य सरकारकडून माहिती प्राप्त झाल्यानंतर आरक्षण आणि मतदार याद्या अंतिम करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येईल.

## महाराष्ट्रातील ‘या’ गावात अळर चे आजपर्यंतचे सर्वात मोठे सर्च ऑपरेशन

# ५०० पोलिसांनी संपूर्ण गाव ताब्यात घेतले आणि...

**■मुंबई I प्रतिनिधी :**

दहशतवादाशी संबंधित एका प्रकरणात राज्याच्या दहशतवादविरोधी पथकाने म्हणजेच महाराष्ट्र एटीएसने ठाण्यातील पडघा इथं छापा टाकला असल्याची माहिती समोर आली आहे. 22 जणांच्या पथकानं कारवाई केली आहे. दहशतवाद्यांसंदर्भात एटीएसनं छापे टाकलेत.. एटीएसनं काही जणांना ताब्यात घेतल्याची माहिती मिळत आहे.

एटीएस पथकानं साकिब नाचनच्या घरावरही छापे टाकलेत. दरम्यान बंदी घालण्यात आलेल्या सिमी या संघटनेचा पदाधिकारी असलेल्या साकिबला यापूर्वी २ दहशतवादी प्रकरणांमध्ये दोषी ठरवण्यात आले आहे. यामध्ये २००२-२००३ मध्ये मुंबई सेंट्रल रेल्वे स्टेशन विलेपार्ले आणि मुलुंड बॉम्बस्फोटांचा समावेश आहे.

या दहशतवादी घटनांमध्ये अनेकांना आपले प्राण गमवावे लागले. तर २०१७ मध्ये शिक्षा पूर्ण झाल्यानंतर तो पुन्हा कट्टरपंथी कारवायांमध्ये सामील झाला, असा आरोप त्याच्यावर आहे. दरम्यान या कारवाईत आता नेमकी काय आणखी नवी माहिती समोर येते हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.





भिवंडीतील बोरीवलीत अळरची धडक कारवाई केली आहे. रविवारी पहाटे ३ वाजेपासून कारवाई सुरू आहे. ४०० ते ५०० पोलिसांनी संपूर्ण गाव ताब्यात घेतले असून परिसराला छावणीचं स्वरुप आले आहे.

भिवंडी तालुक्यातील पडघा जवळील बोरिवली गावात आज सकाळी एटीएसने मोठे सर्च ऑपरेशन सुरू केलं आहे. या ऑपरेशनमुळे संपूर्ण गावात पोलिसांचा मोठ्या प्रमाणात फौजफाटा तैनात करण्यात आला आहे. सध्या एटीएसची संपूर्ण टीम सकाळपासून अनेक संशयास्पद व्यक्तींच्या घरी जाऊन छापेमारी करत आहे. यामुळे गावाला छावणीचं स्वरूप आलं आहे.

**नेमकं काय घडतंय?**

महाराष्ट्रात एटीएसकडून इस्लामिक स्टेट ऑफ इराक अँड सीरियाशी संबंधित कथित दहशतवाद्यांविरोधात मोठी कारवाई केली जात आहे. यात भिवंडी तालुक्यातील पडघा जवळील बोरिवली गावात आज पहाटेपासून महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाने एक मोठं सर्च ऑपरेशन सुरू केलं आहे. या कारवाईमुळे संपूर्ण गावात ४५० ते ५०० पोलिसांचा फौजफाटा तैनात करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, एटीएसकडून सुरू असलेल्या या छापेमारीदरम्यान ८ ते १० संशयितांना ताब्यात घेण्यात आलं आहे. सध्या त्यांची कसून चौकशी सुरु आहे. या कारवाईत ठाणे ग्रामीण, रायगड आणि ठाणे पोलीस दलातील कर्मचारीही बंदोबस्तासाठी तैनात करण्यात आले आहेत.

**बोरिवली गाव दहशतवाद्यांचा तळ**

बोरिवली गाव हे साकिब नाचण आणि इतर दहशतवाद्यांचा तळ म्हणून ओळखलं जातं. यापूर्वीही या गावातून अनेकदा दहशतवाद संबंधित कारवाईंमध्ये सहभागी असलेल्या व्यक्तींना ताब्यात घेण्यात आलं आहे. याच गावातून कुख्यात साकिब नाचण, त्याचा मुलगा आणि इसिसमधील दहशतवादी कृत्यांमध्ये सहभागी असलेल्या १६ जणांना अटक करण्यात आली होती. तसेच पुणे येथील एका प्रकरणात चार जणांना येथूनच ताब्यात घेण्यात आलं होतं. त्यामुळे हे गाव सुरक्षा यंत्रणांच्या रडारवर आहे.

सध्या ताब्यात घेतलेल्या संशयितांची ओळख आणि त्यांच्याकडून मिळालेल्या माहितीबद्दल एटीएसकडून कोणतीही अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही. मात्र, या कारवाईमुळे दहशतवादी कारवायांना आळा घालण्याच्या दृष्टीने हे एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

**साकिब नाचण नक्की कोण?**

साकिब नाचण हा प्रतिबंधित स्टूडंट इस्लामिक मूव्हमेंट ऑफ इंडिया चा पदाधिकारी होता. यापूर्वीच दोन दहशतवादी प्रकरणांमध्ये दोषी ठरला आहे. २००२-२००३ मध्ये झालेल्या मुंबई सेंट्रल रेल्वे स्टेशन, विलेपार्ले आणि मुलुंड बॉम्बस्फोट प्रकरणांमध्ये त्याचा सहभाग असल्याचा आरोप आहे. ज्यामध्ये अनेक निष्पाप लोकांचा बळी गेला होता. २०१७मध्ये शिक्षा पूर्ण केल्यानंतर तो पुन्हा कट्टरपंथी कारवायांमध्ये सहभागी झाल्याचा आरोप आहे.

## हुंडा नको, कर्ज काढून लग्न नको, प्री-वेडिंग बंद करा अन् मुलीच्या आईची संसारात ढवळाढवळ नको

# मराठा समाजाची लग्नासाठी आचारसंहिता

- लग्न सोहळा (१००/२००) मर्यादित लोकात केला जावा.
- प्री-वेडिंग प्रकार बंद करावा. केलाच तर तो लग्न सोहळ्यात जाहीर दाखवू नये.
- कसल्याही परिस्थितीत लग्न वेळेवरच लावावे.
- लग्नात डीजे नको.पारंपरिक वाद्य, लोक कलावंतांना संधी द्या.
- कर्ज काढून लग्नात खर्च करू नये. मराठा समाजात लग्नाच्या कर्जामुळेच अनेक आत्महत्या झालेल्या आहेत.
- नवरदेवापुढे दारू पिऊन नाचणाऱ्या तरुण-तरुणींना पायबंद घालावा.
- हार घालताना नवरा नवरीला उचलू नका.
- लग्नात फक्त वधूपिता आणि वर पिता यांनीच फेटे बांधावेत. पाहुण्यांचे फेटे आणि इतर सत्कार बंद करावेत.
- लग्न, वाढदिवस, उद्घाटन कार्यक्रमात, पुस्तके, झाडाची रोपे किंवा रोख स्वरूपात आहेर करावेत.
- लग्नात प्रमुख व्यक्तीच्या हस्ते सोन्याचे दागिने, गाडीच्या चाव्या, वस्तू देऊ नयेत. देखावा करू नये.
- लग्नात हुंडा देऊ-घेऊ नये. वडिलांची खूपच इच्छा असेल तर मुलीच्या नावावर एफडी करावी.
- लग्न, साखरपुडा, हळद एकाच दिवशी करा.
- लग्नानंतर मुलीच्या आईने मुलीच्या संसारात ढवळाढवळ करू नये. मोबाईलचा वापर गरजेपुरताच करावा.
- पैशासाठी सूनेचा छळ करू नये.
- समाजातील नव उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी आपल्या ऐपतीप्रमाणे आर्थिक मदतीचा हात द्यावा. नुसत्या शुभेच्छा नकोत.
- जेवणात 5 हून अधिक पदार्थ नकोत.
- विविध कार्यक्रमानिमित्त होणाऱ्या भोजन प्रसंगी अन्नाची नासाडी टाळण्यासाठी, सुकी भोजन पाकीट व्यवस्था असावी.
- दशक्रिया विधी पाचव्या दिवशी करा. लग्न आणि दशक्रिया विधीला मान्यवरांचे आशीर्वाद, श्रद्धांजली हा कार्यक्रम बंद करावा. श्रद्धांजलीसाठी गरज वाटल्यास वेगळा विशेष कार्यक्रम घ्यावा.





**■पुणे I प्रतिनिधी :**

पुण्यात वैष्णवी हगवणेच्या आत्महत्येनंतर शाही विवाह सोहळे, हुंडा, मानपान, लग्नातले दिखावे याचीही चर्चा सुरू झाली. यावर अहिल्यानगरमधील मराठा समाजाने अत्यंत पुरोगामी पाऊल उचलत समाजातून हुंडा हद्दपार करण्याचा विडा उचलला आहे. तसेच लग्नातल्या बडेजावाला काट मारणारी एक आचारसंहिताच जाहीर केली आहे. वैष्णवी हगवणे आत्महत्येनंतर खडबडून जागा झालेल्या मराठा समाजातल्या विचारवंतांनी अहिल्यानगरात एक बैठक घेत अतिशय महत्त्वपूर्ण आणि पुरोगामी पाऊल उचललं. लग्न साध्या पद्धतीने करा, हुंडा प्रथा बंद करा, प्रीवेडींग शूट बंद करा असे काही नियम या आचारसंहितेत घालून देण्यात आले आहेत. आचारसंहितेचं पालन करणाऱ्या पालकांचा समाजातर्फे जाहीर सत्कार करण्यात येणार आहे. तसंच आचारसंहितेच्या अंमलबजावणीसाठी ११ जणांची सुकाणू समितीही स्थापन करण्यात आली आहे. विशेष म्हणजे असेच नियम याआधी आगरी समाजानेही तयार केले आहेत. कोकणातही सर्व समाजांच्या लग्नात कित्येक पिढ्या हुंडा, देणीघेणी, मानपान होत नाहीत. तसंच लग्नाचा खर्चही अर्धा अर्धा केला जातो. आता मराठा समाजानेही आचारसंहिता निर्माण करून फुकटच्या बडेजावाला पायबंद घातलाय ही खरोखर स्वागतार्ह बाब आहे.

## कोकणापासून विदर्भापर्यंत कसं असेल हवामान?

# शेतकऱ्यांसह सामान्यांसाठी महत्त्वाचा इशारा

**■मुंबई I प्रतिनिधी :**





महाराष्ट्रात वेळेआधीच दाखल झालेल्या पावसानं आता खरे तालरंग दाखवण्यास सुरुवात केली असून, आगमानंतर काही दिवसांतच हे मोसमी वारे दडी मारून बसले आहेत. राज्यातील काही निवडक भाग वगळता उर्वरित बहुतांश भागांमध्ये पावसानं हजेरी लावलेली नाही असंच चित्र गेल्या २४ तासांमध्ये पाहायला मिळालं. यंदाच्या वर्षी विक्रमी कामगिरी करणाऱ्या नैऋत्य मान्सून वाऱ्यांनी केरळात तुलनेनं बरीच आधी हजेरी लावली होती. असं असलं तरीही अरबी समुद्रातूनच प्रवाह कमी झाल्यानं मान्सूनचा वेग मंदावला आणि हे मोसमी वारे मोठ्या सुट्टीवर गेले. बदललेल्या वातावरणामुळे मान्सूनच्या प्रवासाची गती कमी होण्यास सुरुवात झाली असून, १० जूनपर्यंत तरी मान्सूनचा प्रवास थांबणार असल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

पावसानं मोठ्या सुट्टीवर जाण्याचा बेत आखला असला तरीही कोकण मात्र यास अपवाद ठरत असून तळकोकणापासून ते रत्नागिरीपर्यंत पावसाच्या सरींचीच हजेरी पाहायला मिळत आहे. विदर्भातही पावसाची हजेरी पाहायला मिळणार असून, त्या धर्तीवर या भागांसाठी हवामान विभागानं यलो अलर्ट जारी केला आहे. दरम्यानच्या काळात उर्वरित राज्यात मात्र तापमानात चढ- उतार होताना दिसेल असाही इशारा हवामान विभागानं जारी केला आहे. विदर्भात प्रामुख्यानं वर्धा, अमरावती, यवतमाळ या भागांमध्ये पावसाची हजेरी असेल. उत्तर प्रदेशापासून विदर्भाच्या पूर्वेपर्यंत सक्रिय असणारा कमी दाबाचा तीव्र पट्टा आता विरळ झाला असून, त्यामुळं राज्यातील तापमानाच चढ उतार पाहायला मिळत आहेत. हवामान विभागानं पुढील २४ तासांसाठी वर्तवलेल्या अंदाजानुसार मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, मुंबई शहर आणि उपनगरांमध्ये आकाश अंशतः ढगाळ राहणार असून, अधूनमधून येणाऱ्या पावसाच्या सरी वगळल्या, तर उष्मा जाणवण्यास सुरुवात होणार आहे. दरम्यानच्या काळात उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाड्यात विजांच्या कडकडाटासह एखादी सर बरसू शकते असाही अंदाज वर्तवण्यात आला आहे.

## घराशेजारी शौचालय बांधले... शेजारच्या तरुणांनी तलवारीनं प्राणघातक हल्ला

**■पनवेल I प्रतिनिधी :**

घराबाहेर शौचालय बांधण्याच्या वादातून एका तरुणावर तलवारीने प्राणघातक हल्ला करण्यात आल्याची घटना कल्याण उंबर्डे परिसरात घडली . विक्रांत जाधव असे या जखमी तरुणाचे नाव आहे . जाधव यांच्या शेजारी राहणाऱ्या गायकवाड कुटुंबातील तरुणांनी हा हल्ला केल्याचा आरोप विक्रांत जाधव आणि त्यांचे वडील विजय जाधव यांनी केला. विक्रांतवर कल्याणच्या रुक्मिणीबाई रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी खडकपाडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून पोलिसांनी पुढील तपास सुरू केलाय.

दोन लाख रुपयांची मागणी केल्याचा आरोप देखील विजय जाधव यांनी केला. आज सकाळी विजय जाधव यांचा मुलगा विक्रांत जाधव हा घराशेजारील परिसरात पाणी आणण्यासाठी गेला. याच वेळेस विक्रांतला एकट्याला गाठून गायकवाड कुटुंबातील तरुणांनी विक्रांतवर तलवारीने हल्ला केला. या हल्ल्यात विक्रांत जाधव हा गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर कल्याणच्या रुक्मिणी



रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

याप्रकरणी खडकपाडा पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवण्यात आली असून पोलिसांनी पुढील तपास सुरू केला आहे. विजय जाधव यांच्या सांगण्यानुसार, त्यांनी घराशेजारी शौचालय बांधण्याचे काम सुरू केले होते. मात्र, शेजारी राहत असलेल्या गायकवाड कुटुंबीयांनी या कामाला विरोध केला. वाद इतका वाढला की, दोन लाखांची मागणी करत तसेच जीव मारण्याची धमकीही देण्यात आली.

**नेमका प्रकार काय?**

कल्याण पश्चिम उंबर्डे परिसरात विजय जाधव हे आपल्या कुटुंबासह राहतात. त्यांच्या शेजारीच गायकवाड कुटुंब राहते . विजय जाधव राहत असलेल्या घराच्या जागेवर गायकवाड कुटुंबीयांनी दावा केला असून या जागेवरून जाधव व गायकवाड कुटुंबात गेल्या अनेक वर्षापासून वाद सुरू आहेत . विजय जाधव यांनी आपल्या घराशेजारी शौचालय बांधण्याचे काम सुरू केले होते. या कामाला गायकवाड कुटुंबाने विरोध केला . आठवडाभरापूर्वी हे काम सुरु असताना गायकवाड कुटुंब या ठिकाणी आले व त्यांनी हे काम बंद पडल्याचा आरोप विजय जाधव यांनी केलाय . तसेच गायकवाड कुटुंबियांनी त्यांना काम सुरू केल्यास जीवे ठार मारण्याची धमकी दिली.

## अपेंडिक्सचं ऑपरेशन केलं, अन् रुग्णासोबत भयंकर घडलं, घरच्यांनी पाहताच...

**■मुंबई I प्रतिनिधी :**

राज्यातील आरोग्यव्यवस्थेचे याआधीही अनेकवेळा धिंडवडे निघालेले आहेत. शासकीय रुग्णालयात हलगर्जीपणामुळे अनेक रुग्णांचा जीव गेल्याची अनेक प्रकरणं आतापर्यंत समोर आलेली आहेत. अपुरे मनुष्यबळ, जुने आणि बिनकामची यंत्रं अशा परिस्थितीत अनेक शासकीय रुग्णालयांत रुग्णांवर उपचार केला जातो. कधीकधी मात्र रुग्णांवर उपचार करताना डॉक्टरांकडून मोठ्या चुका होतानाचेही प्रकार समोर आले आहेत. असे असतानाच आता वाशिम जिल्ह्यात एक अजब घटना समोर आली आहे. येथे एका रुग्णावर शस्त्रक्रिया करताना त्याची त्वचा थेट भाजली आहे. या प्रकरणी रुग्णाच्या नातेवाईकांनी पोलिसात तक्रार दाखल केली आहे.

**नेमकं प्रकरण काय?**

वाशिम जिल्हा रुग्णालयात अपेंडिक्सच्या शस्त्रक्रियेवेळी रुग्णाच्या पोटाची त्वचा भाजल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. विशेष म्हणजे हा प्रकार घडल्यानंतर डॉक्टरांनी नातेवाईकांना याची कोणतीही सूचना दिली नसल्याचा आरोप रुग्णांच्या नातेवाईकांनी केला आहे. यासंदर्भात वाशिम पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.





**पोटावर भाजल्याचे घाव पाहिले, अन्...**

शिरपूर येथील अताऊल्ला खान यांना पोटात दुखत असल्याने त्यांनी खासगी दवाखान्यात सोनोग्राफी केली होती. पुढील उपचारासाठी त्यांना जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. १९ मे रोजी त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली. मात्र शस्त्रक्रियेनंतर दोन दिवसांनी जेव्हा रुग्णाच्या नातेवाईकांनी त्याच्या पोटावर भाजल्याचे घाव पाहिले, तेव्हा त्यांनी तत्काळ डॉक्टरांकडे याची चौकशी केली. तेव्हा डॉक्टरांनी या घटनेमागे ‘‘तांत्रिक बिघाड’’ असल्याचे सांगत ती अनावधानाने घडल्याचे स्पष्टीकरण दिले. मात्र, नातेवाईकांनी रुग्णालय प्रशासनाच्या गंभीर हलगर्जीपणाचा आरोप करत पोलिसांत तक्रार दाखल केली आहे.

**डॉक्टर व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी**

या संदर्भात डॉक्टरांची बाजू जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र त्यांनी या सगळ्यावर बोलण्यास नकार दिला आहे. रुग्णाच्या कुटुंबीयांनी डॉक्टर व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी केली आहे. आरोग्य विभागाकडून अद्याप कोणतेही अधिकृत स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही. तर दुसरीकडे पोलिसांनी रुग्णाच्या नातेवाईकाच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. या घटनेमुळे सरकारी रुग्णालयातील कार्यपद्धती, तांत्रिक उपकरणांची स्थिती आणि शस्त्रक्रियेतील सुरक्षा उपाययोजनांवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहेत.

## विद्यार्थिनीच्या छातीवर हात फिरवला अन्... नाशिकमध्ये प्राध्यापकाने ओलांडल्या नैतिकतेच्या सर्व सीमा



**या प्रश्नांचा पोलीस घेत आहेत शोध**

या प्रकरणातील आरोपीने इतरही मुलांना असा त्रास दिला आहे का? त्याच्या या कृत्याबद्दल इतर कोणाला कल्पना होती का? त्याला यामध्ये कोणी मदत करत होतं का? या आणि अशा अनेक प्रश्नांचा सध्या पोलीस शोध घेत आहेत.

**■धुळे I प्रतिनिधी :**

शिक्षक आणि विद्यार्थ्यांचा नात्याला काळिमा फसणारी धक्कादायक घटना नाशिकमधून समोर आली आहे. नाशिक शहरातील एका नामांकित नर्सिंग कॉलेजमधील प्राचार्याविरोधात कॉलेजमधील 4 विद्यार्थिनींने विनयभंगाचा गंभीर आरोप केला आहे. याप्रकरणी भद्रकाली पोलिस ठाण्यात बाल लैंगिक अत्याचार कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.

**नऊ महिन्यांपासून सुरु होता छळ**

प्रवीण रमेश घोलप असे संशयित प्राचायार्चं आहे. पोलिसांनी प्रवीण रमेश घोलपला अटक केली आहे. नाशिकमध्ये एका खाजगी नर्सिंग कॉलेजमध्ये पीडिता मागील 9 महिन्यांपासून शिक्षण घेत आहे. 5 ऑगस्ट 2024 पासून 29 मे 2025 पर्यंत द्वारका सर्कल येथील एका नर्सिंग कॉलेजमध्ये ही पडिता शिकत आहे. या काळात प्राचार्य प्रवीण घोलपने वारंवार पीडितेस त्रास देत शारीरिक संबंधांची मागणी केली. तिच्या खांद्यावर, छातीवर आणि पाठीवर हात फिरवला, तसेच हात हातात घेऊन अश्लील स्पर्श केला, असं तक्रारीमध्ये म्हटलं आहे.

**साडी ओढण्याचा प्रयत्न**

प्राचार्य प्रवीण घोलपने पीडितेची साडी ओढण्याचा प्रयत्न करत अश्लील नजरेने पाहून तिचा विनयभंग केला. असा आरोप पीडितेने केलेल्या तक्रारीत करण्यात आला आहे. पीडितेने लेखी तक्रार दाखल केल्यानंतर एफआयआर नोंदवून पोलिसांनी पुढील कारवाई केली आहे.

**मैत्रिणींबरोबरही असाच प्रकार घडला**

घटना घडली त्यावेळेस पीडिता अतिशय घाबरलेली होती. तिच्या अन्य मैत्रीणींबरोबरही असाच प्रकार घडला असल्याची माहिती तिला समजतात तिने भद्रकाली पोलिस ठाण्यात धाव घेतली. घडलेला प्रकार पोलिसांना सांगितला. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता पोलिसांनी चार वेगवेगळे गुन्हे दाखल करून ४० वर्षीय संशयित प्रवीण घोलपला अटक केली. गुन्ह्यांचा तपास सहाय्यक पोलीस आयुक्त नितीन जाधव करत आहेत.



# संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

## अपयशाचीही जबाबदारी घ्यावी

भारत-पाकिस्तान युद्धसदृश्य स्थितीवेळी भारतातील बेजाबदार माध्यमांनी त्याला आता अण्वस्त्रयुद्ध तेवढं बाकी आहे, असे स्वरुप दिले होते. पुढच्या थोडक्याच मिनिटात पाकव्याप्त काश्मीरसोबतच कराची, इस्लामाबादही भारताच्या ताब्यात येणार असल्याचे आक्रस्ताळी माध्यमांनी सांगायला सुरुवात केली होती. ही अफवा सर्वदूर पोहचवण्यात सोशल मीडियातील आयटी सेलही कामाला लागले होते. पुढे 'न झालेल्या युद्धबंदी' ची घोषणा देशाच्या नेतृत्वाकडून समोर न येता अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्पनी केली. त्यानंतर केंद्रातील सत्ताधारी भाजपने युद्धज्वराच्या स्थितीत जे उन्मादाचे राजकीय पाठबळ मिळवले होते, ते ट्रम्प यांच्या एका घोषणेत गमावले. समाजमाध्यमांवर केंद्र सरकारच्या आंधळ्या समर्थनात 'आता भारत जगच जिंकून शांत होणार' अशा सिकंदरी थाटात उतरलेल्या सोशल मीडियावीरांनाही मोदींच्या 'ऑपरेशन सिंदूर'ची तुलना इंदिरा गांधींच्या भारत-पाकिस्तान युद्धकाळाशी करण्याची हक्की आली. पाकिस्तानविरोधात धार्मिक युद्धज्वर वाढवणाऱ्यांनी इंदिरा गांधींपेक्षा मोदींनी परिस्थिती कशी कौशल्याने हाताळली, पाकिस्तानला कसे नमवले, याची आक्रस्ताळी माध्यमांच्या हवाल्याने घोषणा करायला सुरुवात केली. परंतु पुढे व्हाईट हाऊसने युद्धबंदीची घोषणा करताच, केंद्र आणि पंतप्रधान मोदी यांचे आक्रस्ताळी समर्थक बुचकळ्यात पडले. अरेरे...सावज टप्प्यात आलंच होतं, तर तलवार म्यान कशी झाली, संपूर्ण इस्लामाबाद कराचीसह संपूर्ण पाकिस्तान भारताच्या पायाशी आलाच असताना मोदींनी हे काय केलं, हा प्रश्न मोदींच्या समर्थकांना अडचणीत आणत होता. त्यावर समाधान होईल, असं उत्तर काही त्यांना सापडलं नाही किंवा ते मोदींनीही दिलंच नव्हतं. त्यामुळे भारत पाकिस्तान युद्धकाळात थेट इंदिरा गांधींशी मोदींची केलेली तुलना आता त्यांच्याच अंगलट आली होती. ऑपरेशन सिंदूरमध्ये भारताचे नुकसान झालेलेच नाही, असा पवित्रा घेतलेल्या मोदींच्या राजकीय समर्थकांची भारताच्या तिन्ही सेना दलांचे प्रमुख (सीडीएस) अनिल चौहान यांनी नुकत्याच दिलेल्या माहितीनंतर अडचण झाली आहे. मोदी सरकार देशाची दिशाभूल करत असल्याचा आरोप काँग्रेसच्या मल्लिकार्जुन खर्गे यांनी केला आहे. पाकिस्तानवर विजय मिळवल्यानंतर कौतुकाला पात्र ठरलेल्या मोदी सरकारने आता या युद्धसदृश्य काळात भारताच्या झालेल्या लष्करी नुकसानाचीही जबाबदारी घ्यावी, असा सूर विरोधकांनी लावला आहे. सीडीएस अनिल चौहान म्हणाले की, कोणतेही युद्ध हे नुकसानाशिवाय लढले जाऊ शकत नाही. 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये भारताची लढाऊ विमाने पाडली गेल्याला त्यांनी अप्रत्यक्ष दुजोरा दिला. कुठल्याही लष्कराला युद्धसदृश्य किंवा प्रत्यक्ष युद्धकाळातील स्थितीची माहिती देणे सुरक्षा आणि गोपनीयतेच्या विशेष अधिकारामुळे बंधनकारक नसते, परंतु याच अधिकाराचा वापर राजकीय उद्देशाने होणेही लोकशाहीसाठी योग्य नाही. युद्धाच्या आगीत आपली राजकीय भाकरी शेकणाऱ्यांना आता लोकांना उत्तर द्यावे लागणार आहे. ही उत्तरे मागण्याची संधी विरोधक सोडणार नाहीत, हे स्पष्टच आहे. त्यामुळे भारत-पाकिस्तान युद्धसदृश्य काळात भारताने जे कमावले ते तहात गमावले याच धर्तीवर या युद्धसदृश्य काळात केंद्रातील सत्ताधारी आणि पंतप्रधान मोदींनी देशाच्या 'सक्षम' नेतृत्वामुळे भारताचे नुकसान होऊच दिले नाही, असे जे चित्र उभारले होते, त्याला तडा गेला आहे. पाकिस्तानातील दहशतवाद्यांच्या नांग्या ठेचल्या, भारतीय लष्कराच्या या कृतीचा अभिमान आणि आनंद प्रत्येक भारतीय नागरिकाला आहेच, याच दुमत नाही, मात्र लष्कराच्या कर्तृत्वावर आपले राजकारणाचे हित साध्य करणाऱ्यांनाही ही चपराक असल्याचेही स्पष्ट व्हावे. लष्कराची सुरक्षाविषयक कृती, धोरण हे आपल्या राजकारणाचे साधन असल्याच्या अविर्भावात वावरणाऱ्यांनाही ही चपराक आहे. भारताने केलेल्या सुरुवातीच्या हल्ल्यानंतर आपल्या लढाऊ विमानांचे नुकसान झाले, परंतु त्यातून बोध घेऊन त्याचा अभ्यास करून आपण पुढील रणनीती ठरवली आणि यशस्वी केली, असे चौहान म्हणाले. कुठल्याही युद्ध आणि लढाईत नुकसान होते, या त्यांच्या स्पष्टोक्तीने भारतीय लष्करावरील भारतीयांचा विश्वास तसूभरही कमी होणार नाही, मात्र त्याचा राजकीय फटका लष्कराच्या कारवाईचे श्रेय घेणाऱ्यांच्या प्रयत्नांना बसणार आहे. ऑपरेशन सिंदूर दरम्यान पाकिस्तानमधून भारतावर हल्ल्यासाठी सोडलेले ड्रोन आणि क्षेपणास्त्रे पाडल्यानंतर भारताने त्याची माहिती अधिकृतरित्या दिली होती. परंतु भारताचे किती आणि नेमके कोणते नुकसान पाक लष्कराने ऑपरेशन सिंदूरदरम्यान केले, याची अधिकृत पुराव्यासह माहिती पाकिस्तानला देता आली नाही. त्यामुळे भारताचे लष्करी नुकसान झालेच नाही, अशी स्वतःची पाठ थोपटून घेणाऱ्या राजकीय नेतृत्वाला आता भारताचे नेमके किती आणि कसे नुकसान ऑपरेशन सिंदूरमध्ये झालेले आहे, याची माहिती द्यावी लागणार आहे. देशाला लष्करी कारवायांची माहिती देणे लष्करासाठी बंधनकारक नाही, परंतु ही बंदी बाजूला ठेवून सरकारची प्रतिमा उजळण्यासाठी त्याचा वापर करणाऱ्या केंद्रातील सत्तेला आता या 'कथित' नुकसानाची माहिती द्यावी लागणार आहे. पहलगाम हल्ला हा देशाचे इंटेलिजन्स फेल्युयर होते का?, भारत-पाकच्या वादात व्हाईट हाऊसकडून युद्धबंदीच्या घोषणेचे कारण काय? या प्रश्नाला केंद्रीय नेतृत्वाने दिलेली 'सोयीस्कर बगल' सीडीएस अनिल चौहान यांनी दिलेल्या माहितीनंतर आता देता येणार नाही.




मुंबई पहिल्याच पावसात जलमय झाली. नालेसफाईसाठी कोट्यवधींचा खर्च असूनही साचलेलं पाणी आणि भ्रष्टाचारी ठेकेदारांचे कंत्राट कायम आहे. मेट्रो प्रकल्प, विशेषतः ॲक्वा लाईन १७ दिवसांत जलमय होणं ही अपयशाची साक्ष आहे. प्रशासकीय मनमानी, रखडलेल्या निवडणुका आणि विकासाच्या नावाखाली भ्रष्टाचारामुळे मुंबईकरांना दरवर्षी तसाच त्रास सहन करावा लागतो.

## मुंबई - स्वप्ननगरी की पूरनगरी?

मुंबई हे केवळ एक महानगर नाही, तर भारताची आर्थिक राजधानी, बॉलिवूडचं हृदय, देशाच्या प्रत्येक कोपऱ्यातून आलेल्या स्वप्नवेड्यांची स्वप्नं पूर्ण करणारी मायानगरी. येथे देशातील सर्वात मोठ्या कंपन्यांची मुख्यालयं आहेत, शेअर बाजाराची धुरा येथेच आहे. हे शहर देशातील उत्पादन, कर आणि रोजगार यामध्ये सर्वाधिक योगदान देते.

पण यंदाच्या पहिल्याच पावसात जे घडलं, ते मुंबईच्या 'स्मार्ट सिटी'च्या मुखवट्यामागचं भेसूर वास्तव उघड करणारे होते. मेट्रो स्टेशन, रुग्णालयं, शाळा, बस स्थानकं, लोकल रेल्वे ट्रॅक-सगळीकडे पाणीच पाणी. रस्त्यांवर बंद पडलेली वाहनं, ट्रॅकवर खोळंबलेल्या लोकल, बस स्टॉप, रेल्वे स्टेशन ऑफिसमध्ये अडकलेले कर्मचारी आणि रुग्णालयात पोहोचू न शकलेले पेशंट्स-ही होती 'डिजिटल इंडिया'च्या सर्वात मोठ्या महानगराची पहिल्या पावसातील भयावह अवस्था.

मुंबई महानगरपालिकेने सन २५-२६ या वर्षासाठी ७४,४२७ कोटी रुपयांचा अर्थसंकल्प सादर केला, जो सन २४-२५ च्या तुलनेत सुमारे १४.१९टक्के अधिक आहे. हा अर्थसंकल्प मुंबई महानगरपालिकेच्या इतिहासातील सर्वात मोठा ठरला. रस्ते व वाहतूक विभागासाठी ५,१०० कोटी रुपये, तर सांडपाणी प्रक्रिया केंद्रासाठी ५,५४५ कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

२०२४ मध्ये नालेसफाईसाठी २४९.२७ कोटी रुपये खर्च करण्यात आले, तर २०२५ मध्ये नालेसफाई आणि मिठी नदीतील गाळ काढण्यासाठी ३९५ कोटी रुपये खर्च करण्यात आले. यासाठी ३१ कंत्राटदारांना काम दिलं, पण एवढा पैसा खर्च करूनही मुंबईतील नालेसफाई झाली नाही. फक्त हातसफाई करून मुंबईकरांच्या कराच्या पैशावर डल्ला मारल्याचं पहिल्याच पावसात स्पष्ट झालं.

**न संपणारा नालेसफाई घोटाळा :** मुंबई महापालिकेने दरवर्षीप्रमाणे यंदाही नालेसफाईसाठी २०२४-२५ या वर्षात सुमारे २०० कोटींचा खर्च केला. एवढा खर्च करूनही परिस्थितीत काहीच बदल झालेला दिसला नाही. पहिल्याच पावसात मुंबईच्या जवळपास सर्वच भागांत तीच घाण, तोच गाळ आणि साचलेलं पाणी पाहायला मिळालं. गेल्या अनेक वर्षांत दक्षिण मुंबईत पाणी साचले नव्हते, पण यंदाच्या पहिल्याच पावसात मंत्रालयाच्या गेटवर पाणी साचले होते. महापालिकेने दरवर्षीप्रमाणे नालेसफाईचे टेंडर काढले, नेहमीप्रमाणे ते मर्जीतल्या ठेकेदारांनाच मिळाले. अधिकारी आणि ठेकेदारांच्या भ्रष्ट युतीने सगळ्या तांत्रिक बाबींतून पळवाटा शोधून नाले आणि मिठी नदीमधून गाळापेक्षा जास्त पैसा काढला. नालेसफाई आणि त्यातील भ्रष्टाचार हे वर्षानुवर्षं चालत आलेलं दुष्टचक्र आहे. सरकारं बदलतात, पण परिस्थिती तशीच राहते. तेच नाले, तेच ठेकेदार आणि त्यांना पुन्हा नवे टेंडर-ही साखळी राजकीय पाठिंब्याशिवाय शक्यच नाही, हे सत्य आहे.

**येरे माझ्या मागल्या :** नालेसफाईतील भ्रष्टाचारावर पत्रकार परिषदा होतात, विधीमंडळात प्रश्न विचारले जातात, कॅगच्या अहवालात भ्रष्टाचारावर ताशेरे ओढले जातात, पण कारवाई मात्र होत नाही. दरवर्षी तेच नेते शुभ्र खादीची स्टार्च केलेली वस्त्रं परिधान करून डोक्यावर हेल्मेट ठेवून हातवारे करत नाल्यांच्या काठांवर उभं राहून फोटोशूट करतात. यंदाही हे चित्र दिसलं. या चमकोगिरीमुळे काहीही बदललेलं नाही. वर्षानुवर्षं हेच चालू आहे.

**जलमय झालेली मेट्रो ३ ॲक्वा लाइन :** २०१४ मध्ये देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाल्यानंतर, त्यांनी ''पायाभूत सुविधा'' या गोंडस नावाखाली मेट्रोचे जाळे वाढवण्यास सुरुवात केली. उपनगरे, पूर्व-पश्चिम-दक्षिण-उत्तर अशा सर्व दिशांना मेट्रोची कामं सुरू झाली. तेव्हापासून मुंबईकर अभूतपूर्व वाहतूक समस्यांचा सामना करत आहेत. मेट्रो तयार झाल्यावर या समस्यांमधून दिलासा मिळेल या भाबड्या आशेवर मुंबईकर कोणतीही तक्रार न करता हा जाच सहन करत आहेत. या प्रकल्पातील मेट्रो ३ ॲक्वा लाईन - भुयारी मार्गामुळे पावसात पाणी शिरण्याची शक्यता आणि कोसळणाऱ्या इमारती हे धोक्याचे स्पष्ट संकेत होते, तरीही प्रकल्प रेटण्यात आला. अनेक शास्त्रज्ञ, पर्यावरणतज्ञ, आणि शहरी नियोजनकारांनी या प्रकल्पाला विरोध केला होता. भुयारी मेट्रो मुंबईच्या भूगर्भ रचनेसाठी धोकादायक असल्याचं स्पष्ट सांगितलं गेलं. पण शासनाने हे सल्ले धुडकावून हा प्रकल्प रेटला. एवढा अट्टहास करून सुरू झालेली ही भुयारी मेट्रो उद्घाटनानंतर अवघ्या १७ दिवसांत जलमय झाली. भुयारी स्थानकं स्विमिंग पूलमध्ये रूपांतरित झाली. माध्यमांचे कॅमेरे चित्रीकरणासाठी गेले असता पोलिसी बळ वापरून त्यांना रोखण्यात आलं. स्थानकांची शटरं बंद करून प्रशासन आपला गलथानपणा आणि भ्रष्टाचार झाकण्याचा प्रयत्न करत होतं, पण पावसाने सगळं उघड केलं.

**प्रशासकांचे भ्रष्ट राज :** मुंबई महापालिकेच्या निवडणुका २०२२ पासून रखडलेल्या आहेत. महापालिकेत निवडून आलेले लोकप्रतिनिधी नाहीत. सत्ताधाऱ्यांचे लाडके अधिकारी प्रशासक म्हणून काम पाहत आहेत. त्यांची बांधिलकी मुंबईकर जनतेपेक्षा त्यांना नेमणूक करणाऱ्या सत्ताधाऱ्यांशी अधिक आहे. मुंबई महापालिका देशातील सर्वात श्रीमंत स्थानिक स्वराज्य संस्था आहे. महापालिकेच्या विविध बँकांमध्ये सुमारे ९२,००० कोटींच्या ठेवी होत्या. मुख्यमंत्री व नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी यातील ११,००० कोटींच्या ठेवी मोडून ती रक्कम कंत्राटदारांच्या घशात घातली, असा आरोप आहे. शिंदे यांनी मोठ्या प्रमाणात रस्त्यांचे सिमेंट काँक्रीटीकरण करण्याचा घाट घातला. सहा हजार कोटी रुपयांचे टेंडर वाटले. शहरभर रस्ते खोदून ठेवले. आतापर्यंत फक्त २५ टक्के कामच पूर्ण झाले आहे. पहिल्याच पावसात या रस्त्यांना गटाराचं स्वरूप आलं आणि त्यातून भ्रष्टाचाराचं गढूळ पाणी वाहू लागलं. अर्थसंकल्पातील जवळपास ४० टक्के रक्कम पायाभूत सुविधांवर खर्च केली गेली, पण त्या सुविधा नक्की कुठे आहेत, असा सवाल मुंबईकर करत आहेत.

**मुंबईच्या पायाभूत सुविधांची अवस्था :** सत्ताधाऱ्यांच्या ट्विट आणि भाषणांत जागतिक दर्जाची असते. पण प्रत्यक्षात ती खड्ड्यात रुतलेली, चिखलात माखलेली आणि ठप्प करणारी आहे. ज्या शहरात मिनिटाला कोट्यवधींची उलाढाल होते, जिथून देशाचा शेअर बाजार चालतो, जे शहर झोपत नाही-त्या शहरातील सरकारी रुग्णालयाच्या ओपीडीत पाणी साठल्याने रुग्णसेवा ठप्प होते, ही शरमेची बाब नाही का? मुंबईकरांचा संयम, त्यांची प्रतिकारशक्ती जगभर प्रसिद्ध आहे. ''मुंबई स्पिरिट'' या गोंडस नावाखाली भ्रष्ट सरकारी यंत्रणा त्यांचीच परीक्षा घेत आहे, आणि ही परीक्षा दिवसेंदिवस कठीणच होत चालली आहे. आजचे सत्ताधारी दरवर्षी पूर्वीच्या सरकारांकडे बोट दाखवतात. पण मागील सत्तेत शिंदे हे शिवसेनेत होते, फडणवीस मुख्यमंत्री होते-म्हणजे अपयशात त्यांचा बरोबरीचा वाटा आहे. पण त्याची जबाबदारी ते दुसऱ्यावर ढकलत स्वतःला नामनिराळं ठेवू पाहतात. सत्ताधारी दरवर्षी नियोजनशून्य आणि भ्रष्ट कारभाराची जबाबदारी पावसावर ढकलतात. पण मुंबईला पावसाने नव्हे, तर सत्ताधारी, ठेकेदार आणि अधिकाऱ्यांच्या भ्रष्ट युतीने पाण्यात बुडवलं आहे-हेच सत्य आहे.

## पिचलेली मुंबई

या वर्षी मे महिन्यातच गर्जत बरसत दाखल झालेल्या मान्सूनने अवघ्या काही तासांत मुंबई अस्ताव्यस्त करून टाकली. यात भर पडली ती अवघ्या पंधरवड्यापूर्वी सुरू झालेल्या नव्या भुयारी मेट्रोमार्गाची. वरळीच्या आचार्य अत्रे चौक स्थानकात बांधकामाधीन भिंत कोसळून पाण्याचे लोट रेल्वे रुळांपर्यंत पोहोचले. स्थानक चिखलात बुडाले. कामे पूर्ण होण्याआधीच मेट्रो स्थानक सुरू करण्याची घाई का करण्यात आली, हा प्रश्न उरतोच. हिंदमाता व किंग्ज सर्कल ही मुंबईत पूर्वापार पाणी साचणारी ठिकाणे असली, तरी भूमिगत टाक्यांमुळे गेल्या वर्षीपासून थोडाफार फरक पडला होता. मात्र तो अल्पजीवीच ठरला आणि आता तर दक्षिण मुंबईतील हुतात्मा चौक, ब्रीच कँडी ही नावे पूरग्रस्त भागात समाविष्ट झाली आहेत. गेल्या काही वर्षांत मुंबईतील पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी भूभाग आणि नद्या-नाले, खाड्या कमी पडत आहेत, याकडे पर्यावरणतज्ञ लक्ष वेधत आहेत. पाणी मुरणारी ठिकाणे आक्रसली आहेत. मुंबईसभोवतीची खारफुटी आणि मिठागरे ही स्पंजसारखी काम करतात. परंतु या सर्व पाणथळींचा गळा घोटण्याचे उद्योग गेली अनेक वर्षे सुरू आहेत. नालेसफाई याही वर्षी ७१ टक्केच झालेली होती आणि मिठी नदीतील गाळही ५३ टक्केच बाहेर काढण्यात आला होता. निसगार्चे वेळापत्रक तर बिघडले आहेच. त्यामुळेच. पावसाचे आगमन नेहमीच्या वेळी गृहीत धरून नालेसफाई, पंपांची दुरुस्ती, रस्त्यांच्या काँक्रिटीकरणाची आवराआवर मेअखेरपर्यंत लांबवणे अजिबातच योग्य ठरत नाही. आभाळ भरून येऊ लागले, तरीही मुंबईत यावर्षी ठिकठिकाणी रस्ते काँक्रिटीकरणाच्या कामांना ऊत आला होता. चांगले चांगले रस्तेही फोडून पुन्हा त्यावर काँक्रीट पसरले जात होते. त्याचाही मोठा वाटा या पाणी तुंबण्यात आहे. नालेसफाई ही केवळ पावसाच्या तोंडावर एकदाच करायची, या पूर्वापारच्या गल्लाभरू कार्यक्रमाला कधी तरी मूठमाती द्यावीच लागेल. वडाळा, वांद्रे, रे रोड अशा अनेक परिसरांत काही नाले आयुष्यात स्वच्छ होणार नाहीत, असे वाटते.

## दिवस आहेत तुझे हे फुलायचे

भारतीय न्याय संहिता म्हणजे आयपीसी असूनही, देश म्हणून आपल्याला बालकांवर होणाऱ्या लैंगिक अत्याचाराला प्रतिबंध करणारा कायदा करावा लागला; तो २०१२ मध्ये अस्तित्वात आला. पाश्चिमात्य देशात कायदा अस्तित्वात आला की, त्याची अंमलबजावणी सुरू होते. लोकांनाही तो कायदा पारित झाला किंवा लागू झाला, त्याचे नोटिफिकेशन आले की, लोक त्याची नोंद घेतात आणि कायद्याप्रमाणे वागू लागतात.

आपल्या देशात ४२हून अधिक कायदे स्वातंत्र्यपूर्व आणि स्वतंत्र भारतात स्त्रिया आणि बालकांना सुरक्षित करण्यासाठी, हिंसामुक्त करण्यासाठी पारित करावे लागले. या प्रत्येक कायद्याचा इतिहास जर आपण तपासला, तर पीडित व्यक्तीने किंवा महिलांच्या संघटनांनी आंदोलन करून शासनासमोर आव्हान उभे करून, कायद्याचा मसुदा बनवेपर्यंत पुढाकार घेऊन मगच कायदा अस्तित्वात आल्याचे आपल्या लक्षात येईल. कायदा जरी लोकप्रतिनिधी संसदेत किंवा विधानसभेत पारित करीत असले, तरी कायदा अस्तित्वात यावा यासाठीचा लढा भारतात सामाजिक चळवळीतील कार्यकर्त्यांनीच दिलेला आहे. बालकांवर होणाऱ्या लैंगिक अत्याचाराला प्रतिबंध करणारा कायदा २०१२ मध्ये अस्तित्वात आला. कायद्यात अतिशय महत्त्वाच्या अशा तरतुदी करण्यात आल्या; पण या तरतुदींकडे आणि बालकांच्या लैंगिक शोषणापासून होणाऱ्या मुक्तीकडे निकोप दृष्टिकोनातून बघून कायद्याचा वापर केला जाईल तो भारत कसला?

१८ वर्षांखालील मुली आणि मुलांना 'बालक' असे संबोधण्यात आले आहे आणि त्यांच्या संदर्भात स्त्रिया किंवा पुरुषांनी, प्रौढ किंवा बालक असणाऱ्यांनी जर काही लैंगिक अत्याचार केले किंवा करण्याचा प्रयत्न केला; ते व्हर्चुअल म्हणजे समाजमाध्यमावर अशारीरिक जरी असले, तरी या कायद्यानुसार त्यांच्यावर गुन्हा दाखल होऊ शकतो. पॉक्सो कायद्यानुसार, कोणाही व्यक्तीने, संस्थेने किंवा प्रशासकीय यंत्रणेने अशा प्रकारे घडलेल्या घटनांच्या संदर्भात गुन्हा दाखल करण्यात कुचराई केली, तर त्यांच्यावरही गुन्हा दाखल होऊन शिक्षा होऊ शकते. इतकेच नव्हे तर अशाप्रकारे घडलेल्या गुन्ह्यांचे वृत्तांत करताना कुठल्याही प्रकारे बालकांच्या प्रतिष्ठेला आणि त्यांच्या गोपनीयतेला आच येत असेल, तर त्या संदर्भात संबंधित प्रकाशक आणि निमार्ता, म्हणजे अशी बातमी तयार करणाऱ्या बातमीदारावर देखील गुन्हा दाखल होऊ शकतो. इतकेच नव्हे तर घडलेल्या गुन्ह्याच्या बाबतीत बालकाचा जबाब घेत असताना, बालकाला त्याच्या पालकांसमवेत त्याच्या घरीच त्याचा जबाब घेण्यात यावा. अगदीच पोलीस स्टेशनमध्ये तो जबाब घ्यायचीच वेळ आली, तर त्या वेळी बाल समुपदेशक त्या ठिकाणी हजर असले पाहिजे. जबाब घेणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांनी युनिफॉर्म न घालता तो जबाब घेतला पाहिजे. बालकांनी जर वैद्यकीय तपासणीला नकार दिला, तर तो मान्य केला पाहिजे आणि वैद्यकीय तपासणी करून जर नमुने घेतले, तर ते ४८ तासांच्या आत संबंधित प्रयोगशाळेमध्ये पाठवले गेले पाहिजे. प्रत्यक्षामध्ये, ज्यावेळेला गुन्हे घडतात किंवा कोर्टात आणले जातात, तेव्हा मोठ्या प्रमाणावर कायद्यातील या सगळ्या तरतुदी जाणीवपूर्वक, विचार करून केलेल्या असल्या तरी त्याकडे दुर्लक्ष केले जाते. त्याची दोन कारणे दिसतात; एक तर या कायद्याच्या संदर्भात ज्या पद्धतीची संवेदनशीलता दाखवून प्रशिक्षण व्हायला हवं, ते दिलं जात नाही; आणि दुसरं कारण म्हणजे मोठ्या प्रमाणावर गुन्हेगाराला सोडवण्यासाठी भ्रष्टाचार होतो आणि गुन्हेगाराला वाचवण्यासाठी जाणूनबुजून प्रोटोकॉल फॉलो न करता गुन्हेगाराला मदत होईल अशा पद्धतीने तपास यंत्रणा काम करते.

अतिशय संवेदनशीलपणे ड्राफ्ट करण्यात आलेल्या या कायद्यामध्ये कलम २९ अतिशय महत्त्वाचं मानलं गेलं आहे, ज्याला प्रिझम्प्शन ऑफ इनोसन्स म्हणतात. म्हणजे एकदा पोलिसांनी घडलेल्या घटनेच्या बाबतीत त्या बाधित बालकाचा जबाब घेतला आणि तो कोर्टामध्ये कोर्टासमोर 'इन कॅमेरा' म्हणजे गोपनीय पद्धतीने पुन्हा एकदा त्या बालकाने सांगितला, आणि तो सांगत असताना कुठल्याही परिस्थितीत त्या ठिकाणी आरोपी हजर राहणार नाही याची दक्षता घेतली गेली, तर त्यानंतर कोर्ट हे गृहीत धरेल की जे बालकाने सांगितलेले आहे ते तसंच घडलं आहे, यावर कोणतीही शंका घेतली जाणार नाही. मग सरकार पक्षाला बालकाच्या बाजूने पुन्हा गुन्हा सिद्ध करण्यासाठी वेगळे काही करण्याची गरज नाही. आपण हा गुन्हा केला नाही, हे सिद्ध करण्याची सर्वस्वी जबाबदारी आरोपीकडे जाते; गुन्हा दाखल करणाऱ्या यंत्रणेचे काम पूर्ण होते. कायद्याच्या भाषेत सांगायचे झाले तर, एरवी ज्या वेळेला सरकार पक्ष फौजदारी स्वरूपाच्या गुन्ह्यांमध्ये गुन्हे दाखल करतात, त्यावेळेला सर्व चौकशी, साक्षी, पुरावे हे सरकार पक्षाला सिद्ध करावे लागतात, परंतु या प्रकरणांमध्ये मात्र प्रिझम्प्शन ऑफ इनोसन्स

२०१२ मध्ये पोक्सो कायदा बालकांवरील लैंगिक अत्याचार रोखण्यासाठी अस्तित्वात आला. या कायद्यात गंभीर तरतुदी असूनही त्याची अंमलबजावणी कमी आहे. किशोरवयीन मुलांचे परस्पर संमतीने संबंध असतानाही त्यांच्यावर गुन्हे दाखल होतात. दिल्ली उच्च न्यायालयाने यावर निकोप दृष्टीकोन सुचवला असून प्रेमाला गुन्हा ठरवू नये, तर शोषण रोखावे, असे मत व्यक्त केले. कायद्याच्या योग्य वापराची आणि लैंगिक शिक्षणाची गरज अधोरेखित झाली आहे.



या विशेष २९ व्या कलमामुळे सरकार पक्षाचे काम बालकाच्या हितासाठी सोपे करण्यात आले आहे. भारतीय न्याय संहिता असून देखील हा वेगळा कायदा करून फार महत्त्वाची भूमिका देश म्हणून घेतली.

परंतु आज पोक्सोखाली दाखल झालेल्या गुन्ह्यांपैकी ७० टक्क्यांहून अधिक गुन्हे १६ ते १८ वयोगटातील बालकांवर दाखल झालेले दिसतात. बदललेल्या परिस्थितीमुळे मोठ्या प्रमाणावर वेगवेगळ्या जाती-धर्मातील पौगंडावस्थेतील किशोरवयीन मुलं-मुली एकत्र येतात, प्रेमात पडतात. लहान वयाच्या मुली आणि मुलं एकत्र पळून जातात आणि पुन्हा ते जेव्हा सापडतात, त्यावेळेला मुलीला मुलीकडचे लोक ताब्यात घेतात आणि मुलाविरुद्ध मात्र सदर कायद्यानुसार गुन्हा दाखल होतो. अतिशय लहान वयात प्रेमात पडल्यामुळे आणि नीटपणे सेक्स एज्युकेशन न मिळाल्यामुळे या पद्धतीच्या घटना सर्रास घडताना दिसत आहेत. इतकेच नव्हे तर बालकांचा वापर हा प्रौढांच्या काही लैंगिक गैरवर्तनाच्या संदर्भाने किंवा जमिनीच्या वादाच्या संदर्भात किंवा राजकारणासाठी आपल्या विरुद्ध प्रतिवादीवर खोटे गुन्हे दाखल करण्याकडेही कल दिसतो आहे. ही बाब दिवसेंदिवस चिंता वाढवणारी आहे; म्हणूनच अलिकडे दिल्ली उच्च न्यायालयाने दिलेला एक महत्त्वपूर्ण न्याय निवाडा अतिशय महत्त्वाचा आहे.

२०२० सालच्या एका गुन्ह्यामधील आरोपीला निर्दोष मुक्त केले म्हणून दाखल करण्यात आलेले अपील फेटाळताना कोटार्ने महत्त्वपूर्ण अशी टिप्पणी केली आहे. प्रेम ही माणसाची मूलभूत, अतिशय सुंदर अशी भावना आहे आणि ती जर किशोरवयीन मुला-मुलींनी सहमतीने कोणत्याही शोषणाशिवाय, अत्याचाराशिवाय, जबरदस्तीशिवाय अनुभवली असेल, तर केवळ वयाचा हवाला देऊन संबंधित मुला-मुलींना गुन्हेगार ठरवणे योग्य होणार नाही. कायद्याने मानवी दृष्टिकोनातून या प्रेम संबंधांकडे पाहिलं पाहिजे, त्यांचा प्रेम करण्याचा जो मूलभूत अधिकार आहे तो मान्य केला पाहिजे, असे म्हटले आहे. १६ ते १८ वयोगटातील वेगवेगळ्या जाती-धमार्तील मुलं अशा पद्धतीच्या प्रेमामध्ये सध्या आढळत आहेत आणि धर्मांध, जात्यंध आणि प्रतिष्ठेच्या खोट्या बेगडी कल्पनांपोटी योनीशुचितेचे भूत डोक्यावर असणाऱ्या पुरुषसत्ताक व्यवस्थेला बळी पडून, किशोरवयीन मुला-मुलींच्या या प्रेम संबंधांकडे निकोप दृष्टीने न पाहता, योग्य प्रकारे त्यांचे समुपदेशन न करता त्यांना गुन्हेगार ठरवले जाते. बालकांवर होणाऱ्या लैंगिक अत्याचार आणि शोषणाला पायबंद घालण्याला आपला पाठिंबाच असला पाहिजे; पण त्याच वेळेला किशोरवयीन मुलं मुली जर अशा पद्धतीच्या प्रेम संबंधांमध्ये सहमतीने गुंतले जात असतील, तर त्यांना योग्य असे लैंगिक शिक्षण देणे, समुपदेशन करणे आणि त्यांच्या प्रेम करण्याच्या मूलभूत भावनेचा आदर करणे महत्त्वाचे आहे. म्हणून दिल्ली उच्च न्यायालयाच्या माननीय न्यायाधीश जसमित सिंग यांनी प्रेमाच्या चौकटीत राहून राज्यघटनेकडे आणि कायद्याकडे पहावे आणि मगच अशा घटनांचा न्यायनिवाडा करावा, असे म्हटले आहे.

मुलीने जर आपल्या जबाबात आपण सहमतीने शरीर संबंध केल्याचे म्हटले असेल आणि हीच बाब ती कोर्टासमोरही शपथेवर सांगत असेल, तर तिचा जबाब ग्राह्य मानला गेला पाहिजे. किशोरवयीन नातेसंबंध जर सहमतीने आणि जबरदस्ती शिवाय असतील, तर त्यांना मान्यता देण्यासाठी आणि त्यांचा आदर करण्यासाठी कायदा विकसित झाला पाहिजे. दिल्ली उच्च न्यायालयाने पोक्सो आरोपींची निर्दोष मुक्तता कायम ठेवली. अल्पवयीन मुलांचे संरक्षण करण्यासाठी संमतीचे कायदेशीर वय महत्त्वाचे असले तरी, किशोरांना त्यांच्या भावना व्यक्त करण्याची आणि गुन्हेगार ठरण्याच्या भितीशिवाय संबंध जोडण्याची परवानगी दिली पाहिजे. कायद्याचा भर प्रेमाला शिक्षा करण्यापेक्षा शोषण आणि गैरवापर रोखण्यावर असला पाहिजे, असे म्हटले आहे.

दिल्ली उच्च न्यायालयात दाखल या अपिलावर निर्णय देताना न्यायाधीश माननीय जसमितसिंग यांनी न्याय निवाडा करताना ही महत्त्वपूर्ण टिप्पणी केली आहे. सदर प्रकरणात माननीय न्यायाधीश जसमित सिंग, यांनी म्हटले आहे की, किशोरवयीन प्रेमाबद्दलच्या सामाजिक आणि कायदेशीर दृष्टिकोनातून तरुण व्यक्तींना शोषण आणि गैरवापराशिवाय, जबरदस्तीशिवाय मुक्त असलेल्या प्रेमसंबंधांमध्ये गुंतण्याच्या अधिकारांवर भर दिला पाहिजे. प्रेम हा एक मूलभूत मानवी अनुभव आहे आणि किशोरवयीन मुलांना भावनिक संबंध निर्माण करण्याचा अधिकार आहे. जोपर्यंत ते सहमतीने आणि जबरदस्ती न करता प्रेम संबंध प्रस्थापित करत आहेत तोपर्यंत या संबंधांना मान्यता आणि आदर देण्यासाठी कायदा विकसित केला पाहिजे. न्यायालयाने असे म्हटले की, १०-०२-२०२० रोजीचा वादग्रस्त निकाल योग्य होता आणि त्यात कोणत्याही हस्तक्षेपाची आवश्यकता नाही म्हणून, अपील फेटाळून लावले.

प्रकरणाची पार्श्वभूमी अशी आहे की, १०-१२-२०१४ रोजी, रात्री १२:२५ वाजता, फिर्यादीच्या वडिलांनी त्यांची १७ वर्षांची बारावीत शिकणारी मुलगी बेपत्ता झाल्याची तक्रार नोंदवली. फिर्यादी शिकवणीसाठी गेली होती पण घरी परतली नाही. तक्रारदाराने आरोपीवर संशय व्यक्त केला जो त्याच्या घरातूनही बेपत्ता होता. तपासादरम्यान, फिर्यादी आणि आरोपींना धारुहेरा येथे अटक करण्यात आली आणि त्यांना दिल्लीला आणण्यात आले. फियार्दीची वैद्यकीय तपासणी करण्यात आली आणि फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम १६४ (१) अंतर्गत तिचा जबाब नोंदवण्यात आला. आरोपीलाही अटक करण्यात आली. ०६-०८-२०१५ रोजी, आरोपीविरुद्ध पोक्सो कायद्याच्या कलम ४ अंतर्गत आरोप निश्चित करण्यात आले, ज्यामध्ये तो दोषी नसल्याचे सांगितले आणि खटल्याची सुनावणी सुरू झाली.

वादग्रस्त निकालातील संपूर्ण पुराव्यांचा विचार केल्यानंतर, ट्रायल कोर्टाने पोक्सो कायद्याच्या कलम चार अंतर्गत प्रतिवादीला निर्दोष मुक्त केले. वादग्रस्त निकालामुळे नाराज होऊन, दिल्ली उच्च न्यायालयात या निकालाविरुद्ध अपील दाखल करण्यात आले. हे अपील फेटाळताना विश्लेषण करून कायद्याचा अन्वयार्थ लावत दिलेल्या निर्णयात न्यायालयाने म्हटले, की सदर प्रकरणात मुलगी जवळजवळ १७ वर्षांची होती आणि वयाचा कोणताही निर्णायक पुरावा नव्हता, तिथे आरोपीविरुद्ध पोक्सो कायद्याच्या तरतुदी लागू करणे असुरक्षित होते. जेव्हा बाधित बालकाचे वय आणि प्रौढत्वाच्या वयातील फरक फक्त एक किंवा दोन वर्षांचा असेल तेव्हा, पोक्सो कायद्याअंतर्गत एखाद्या व्यक्तीला दोषी ठरवणे कठोर आणि अन्याय्य ठरेल. याव्यतिरिक्त, न्यायालयाने असे नमूद केले की, फौजदारी दंड संहितेच्या कलम १६४ अंतर्गत तिच्या जबाबात, सरकारी वकिलांनी स्पष्टपणे म्हटले होते की, तिचे आणि आरोपीमधील संबंध तिच्या संमतीने होते. तिच्या न्यायालयीन साक्षीतही तिने असे म्हटले होते की, तिच्या आणि आरोपीमध्ये तिच्या संमतीने शारीरिक संबंध झाले होते. न्यायालयाने असे म्हटले आहे की, या प्रकरणात सिद्ध झालेल्या सर्व तथ्यांवरून स्पष्टपणे दिसून येते की, मुलगी आरोपीसोबत जाण्यास तयार आहे आणि त्यांच्यातील शारीरिक संबंध हे संमतीने होते.

न्यायालयाने म्हटले की, अल्पवयीन मुलांचे संरक्षण करण्यासाठी संमतीचे कायदेशीर वय महत्त्वाचे असले तरी, किशोरांना त्यांच्या भावना व्यक्त करण्याची आणि आपल्याला गुन्हेगार ठरवले जाईल या भीती शिवाय संबंध जोडण्याची परवानगी दिली पाहिजे. कायद्याचा भर प्रेमाला शिक्षा करण्याऐवजी शोषण आणि गैरवापर रोखण्यावर असावा. न्यायालयाने पुष्टी दिली की, सहमती आणि आदरयुक्त किशोरवयीन प्रेम हा मानवी विकासाचा एक नैसर्गिक भाग आहे. कायदेशीर व्यवस्थेने तरुणांच्या प्रेमाच्या अधिकारांचे रक्षण केले पाहिजे आणि त्यांची सुरक्षितता आणि कल्याण सुनिश्चित केले पाहिजे. न्यायालयाने म्हटले की, मुलांच्या संरक्षणासाठी पोक्सो कायदा लागू करण्यात आला होता, परंतु १८ वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलीने स्वतःच्या मजीर्ने आणि इच्छेने जोडीदार निवडला तर तिच्यात कोणताही भेदभाव करू नये; म्हणून, न्यायालयाने असे म्हटले आहे की, अशा प्रकारच्या प्रकरणात, जिथे अल्पवयीन मुलगी तिच्या मतांवर आणि इच्छेवर निश्चित आणि अढळ होती, तेव्हा तिचे वय आजच्या तारखेला १८ वर्षे नव्हते आणि ती फक्त १६ वर्षे, १० महिने, २१ दिवसांची होती या कारणास्तव तिचे मत बाजूला ठेवणे या न्यायालयाला योग्य वाटत नाही.

# व्हेज खिमा रोल

**साहित्य:** सोया ग्रानुल्स- १ वाटी, कांदे- २, टोमॅटो- १, आलं-लसूण-हिरवी मिरची पेस्ट- दीड चमचा, कोथिंबीर चिरून- अर्धी वाटी, लाल तिखट- अर्धा चमचा, हळद- अर्धा चमचा, गरम मसाला- १ चमचा, तेल- २ चमचे, पुदिना चटणी- २ चमचे, चाट मसाला- १ चमचा, मीठ- चवीनुसार, पोळीसाठी- गव्हाचं पीठ- २ वाट्या, तेल- अर्धा चमचा.



**कृती:** सारणासाठी- सोया ग्रानुल्स ४ वाट्या गरम पाण्यात १५ मिनिटे बुडवून ठेवा. कांदा, टोमॅटो चिरून घ्या. सोया मधील जास्तीचं पाणी पिळून काढून टाका. पॅनमध्ये तेलावर निम्मा कांदा सोनेरी होईपर्यंत परतून घ्या. आलं, लसूण, हिरवी मिरची पेस्ट परतून घ्या. सोया ग्रानुल्स घालून परता. हळद, लाल तिखट, गरम मसाला घाला, परता. टॉमॅटो, मीठ घालून शिजेपर्यंत परता. गॅसवरून उतरवून कोथिंबीर घाला. पोळीसाठी कणिक भिजवून घ्या. १५ मिनिटांनी पोळी लाटून भाजून घ्या. गरम असतानाच व्हेज खिम्याचे मिश्रण, पोळीच्या मधोमध पसरा. चिरलेला कच्चा कांदा, पुदिना चटणी, चाट मसाला घाला. गुंडाळून रोल तयार करा.

# नारळाचे तेल : त्वचेसाठी वरदान

**नारळाचे तेल हे केवळ केसांसाठी नव्हे तर आपल्या त्वचेकरिता देखील वरदान आहे. याच्या वापराने त्वचेवर फ्री रॅडिकल्सचे परिणाम नाहीसे होतात. खोबरेल तेलामध्ये अँटी ऑक्सिडंट्सचे प्रमाण जास्त असते.**

**कित्येक** शतके आपण परंपरेने चालत आलेल्या अनेक घरगुती उपायांचा अवलंब करत आलो आहोत. पण जसजसा काळ बदलला, तसतसे हे उपाय देखील काहीसे बदलत गेले. आपल्या आसपासच्या वातावरणामध्ये सतत वाढती कमान असलेले प्रदूषण, आपली बदलती जीवनशैली, यांच्यामुळे आपले आरोग्य, त्वचा आणि केस यांच्यावर दुष्परिणाम दिसून येऊ लागले आहेत. त्यामुळे आपल्या आरोग्याच्या बदलत्या गरजांनुसार आपण आपल्या केसांच्या, त्वचेच्या आरोग्याकरिता करत असलेल्या उपायांमध्ये देखील बदल करण्याची गरज आहे.



यासाठी बाजारामध्ये अनेक तऱ्हेची प्रॉडक्ट्स उपलब्ध आहेत. पण केवळ एका वस्तूने आपण आपली त्वचा, आणि केस यांची उत्तम काळजी घेऊ शकतो, ते म्हणजे नारळाचे किंवा खोबरेल तेल.



▮नारळाचे तेल हे केवळ केसांसाठी नव्हे तर आपल्या त्वचेकरिता देखील वरदान आहे. याच्या वापराने त्वचेवर फ्री रॅडिकल्सचे परिणाम नाहीसे होतात.

▮खोबरेल तेलामध्ये अँटी ऑक्सिडंट्सचे प्रमाण जास्त आहे. यामुळे त्वचेतील घातक द्रव्ये बाहेर पडण्यास मदत होते.

▮नारळाचे तेल उत्तम मॉईश्चरायझर आहे. सर्व प्रकारच्या त्वचेसाठी नारळाचे तेल गुणकारी आहे. याच्या नियमित वापराने त्वचेवरील सुरकुत्या नाहीशा होण्यास मदत होते.

▮नारळाच्या तेलाचे गुण आणखी वाढवण्याकरिता त्यामध्ये कापूर घालून हे तेल चेहऱ्याला लावावे व दहा मिनिटे चेहऱ्यावर राहू द्यावे. या कापूरमिश्रित तेलाने त्वचेची निरनिराळी इन्फेक्शन्स दूर होण्यास मदत होते. हे मिश्रण बनवण्यासाठी शंभर ग्रॅम नारळाच्या तेलामध्ये एक कापराची वडी मिसळावी. त्वचेवरील भाजल्याचे वण, टाचांवरील भेगा, त्वचेवर आलेले काळे डाग हटवण्यासाठी कापूर मिश्रित तेल वापरावे.

# जाणून घ्या हे बदामाचे १० फायदे



▮सकाळी भिजवलेले बदाम खाल्ले तर त्यात औषधी गुणधर्म जास्त असतात. कोरड्या बदामांपेक्षा पाण्यात भिजवून खाल्लेले बदाम जास्त पौष्टिक असतात.

▮बदामांच्या सेवनाने सर्दी आणि पडसे कमी होते. रात्री झोपताना भिजवलेले बदाम आणि गरम दूध घेतले तर सर्दी कमी होते.

▮बदामाने काही काळ भूक भागवली जाते.

▮डाएटिंग करणारे लोक अधिक प्रमाणात बदाम खातात. डाएटिंग करणारे भूक लागल्यास इतर पदार्थांपेक्षा १२ बदाम खातात. हे बारा बदाम एका ब्रेकफास्टचे काम करतात.

▮बदामामुळे पोषक द्रव्ये मिळतात आणि कॅलरीजही वाढत नाहीत.

▮मधुमेह झालेल्या व्यक्तींनी बदाम खाल्ल्यास त्यांची शुगर लेव्हल नियंत्रणात राहते.

▮बदामाची साल कोरडी असल्याने सहसा लोक ती काढून टाकतात. पण ही साल शरीरातील रक्त पातळी वाढवण्यास मदत करते. म्हणून बदाम हे सालासकट खाल्ले पाहिजेत.

▮बदामामध्ये तांब्याचे प्रमाण जास्त असते, जे रक्त शुद्धीकरण करण्यास उपयुक्त ठरते.

▮बदामामुळे कोरड्या त्वचेचा स्निग्धपणा वाढण्यास मदत होते.

▮बदामाच्या सेवनाने केस गळण्याचे प्रमाणही कमी होते.

# लहान मुलांमधील वाढता लठ्ठपणा ठरतोय नैराश्याचं कारण

**वयाच्या सातव्या वर्षी जर तुमचं मूल लठ्ठ असेल तर ही धोक्याची घंटा आहे. कारण वयाच्या अकराव्या वर्षापर्यंत त्याला नैराश्य गाठू शकतं. लठ्ठ मुलांमध्ये अकारण चिंता तसंच भावनिक असंतुलन यांसारख्या मानसिक समस्या आढळून येत असल्याचं यूकेमधील एका अभ्यासामधून समोर आलं आहे.**

लठ्ठपणा आणि मानसिक आरोग्य या दोन्ही गोष्टी एकमेकांशी जोडलेल्या असतात, असं लिव्हरपूल येथील संशोधकांना आढळून आलं आहे. मुलं जशी मोठी होतात, तशा या समस्याही वाढत असल्याचं संशोधनातून समोर आलं आहे.

ज्या मुलींचा BMI (Body Mass Index) आवश्यकतेपेक्षा अधिक असतो, अशा मुलींना मुलांच्या तुलनेत नैराश्य लवकर ग्रासतं. या समस्येमागची नेमकी कारणं काय आहेत, हे शोधण्याचा प्रयत्न मात्र संशोधनातून झाला नाही. लठ्ठपणा आणि मानसिक आजार या दोन्हीमागे दारिद्र्य हा एक घटक असल्याचं मत संशोधनातून मांडण्यात आलं आहे.

लठ्ठपणा आणि मानसिक आरोग्यावर केलेल्या या संशोधनातले निष्कर्ष हे ग्लास्गोमध्ये होणाऱ्या EuropeanCongress on Obesity मध्ये सादर करण्यात येतील. संशोधकांनी २००० ते २००२ या वर्षांत यूकेमध्ये जन्मलेल्या १७ हजारांहून अधिक मुलांची माहिती गोळा करून त्याचं विश्लेषण केलं. संशोधकांनी गोळा केलेल्या



माहितीमध्ये मुलांची उंची आणि वजन यासोबतच त्यांना वयाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर भेडसावणाऱ्या भावनिक समस्यांची माहिती घेतली.

वयाच्या तिसऱ्या, पाचव्या, सातव्या, अकराव्या आणि चौदाव्या वर्षी या मुलांचं वर्तन नेमकं कसं होतं, याची माहिती पालकांकडूनच घेण्यात आली होती. सातव्या वर्षापासून लठ्ठपणा आणि भावनिक समस्यांचा एकमेकांशी असलेला संबंध उघड व्हायला सुरुवात होते. त्यापूर्वी या दोन्हींमधला संबंध स्पष्टपणे दिसून येत नाही. आमच्या संशोधनातून लठ्ठपणा आणि भावनिक समस्यांचा संबंध स्पष्ट झाला, असं लिव्हरपूल युनिव्हर्सिटीमधील मानसशास्त्राचे व्याख्याता डॉ. शार्लेट हार्डमन यांनी स्पष्ट केलं.

लठ्ठपणाच्या समस्येनं ग्रासलेल्या मुलांवर उपचार करणाऱ्यांसाठी ही नवीन माहिती उपयुक्त आहे. 'बऱ्याचदा लोकांना असं वाटतं की कमी खाल्लं आणि अधिक व्यायाम केल्यावर काहीच त्रास होणार नाही. पण हे इतकं सोपं नाहीये.' 'वयाच्या सातव्या वर्षापासून ही मुलं लठ्ठपणा आणि मानसिक आजाराच्या दुष्टचक्रात अडकतात,' असं डॉ. हार्डमन सांगतात. लहान मुलांमध्ये मोठ्या प्रमाणावर दिसून येणाऱ्या या समस्या सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने चिंतेचा विषय आहे. कारण मोठेपणीही आरोग्यावर याचे दुष्परिणाम दिसून येतात.

# 'फार्मा सही दाम' ॲप वापरा आणि स्वस्तात औषधे मिळवा

औषधांच्या वाढत्या बिलांचा तुम्हालाही त्रास होत असेल, तर तुमच्यासाठी ही बातमी दिलासा देणारी आहे. कारण केंद्र सरकारने नुकतेच 'फार्मा सही दाम' नावाचे ॲप लाँच केले आहे, ज्यामुळे ग्राहकांना ब्रँडेड औषधांप्रमाणे गुणकारी औषधे कमी दरात मिळण्यास मदत होणार आहे. हे ॲप नॅशनल फार्मास्युटिकल प्राइसिंग ॲथॉरिटीने विकसित केले असून ते अँड्रॉइड आणि आयओएस दोन्ही वापरकर्ते वापरू शकतात. ग्राहकांना स्वस्तात समान दर्जाच्या ब्रँडेड औषधांना पर्याय उपलब्ध व्हावा, यासाठी हे ॲप सुरू करण्यात आले आहे. म्हणजेच ॲपच्या मदतीने महागड्या औषधांना स्वस्त पर्याय मिळू शकतो.

**'फार्मा सही दाम' हे एक असं ॲप, जे ग्राहकांना स्वस्तात समान दर्जाच्या ब्रँडेड औषधांचा पर्याय उपलब्ध करून देण्यासाठी सुरू करण्यात आले आहे. म्हणजेच ॲपच्या मदतीने महागड्या औषधांना स्वस्त पर्याय मिळू शकतो.**

**ॲप कसे काम करते?**

जर तुमच्या डॉक्टरांनी तुमच्या आजारासाठी ब्रँडेड औषध लिहून दिले असेल तर तुम्ही ॲपच्या मदतीने त्याचा स्वस्त पर्याय शोधू शकता. यासाठी तुम्हाला ॲपमध्ये औषधाचे नाव टाइप करावे लागेल. मग ते तुम्हाला ब्रँडेड औषधांच्या स्वस्त पर्यायांची संपूर्ण यादी दाखवेल, जे तुम्ही कुठूनही खरेदी करू शकता. हे लक्षात ठेवा की, ही औषधे वेगवेगळ्या नावांनी उपलब्ध असू शकतात, परंतु औषधाची क्रिया सारखीच राहील. या औषधांचे औषधी गुणधर्महीे तेच राहतील आणि त्यांची क्रियाही तिच असेल. तर सोप्या भाषेत समजून घेण्याचा प्रयत्न केला तर उदाहरण म्हणून 'ऑगमेंटिन' हे भारतात सर्वाधिक विकल्या जाणाऱ्या औषधांपैकी एक आहे. या ब्रँडेड औषधाच्या १० गोळ्यांची किंमत सुमारे २०० रुपये आहे. पण या ॲपमध्ये तुम्हाला या औषधाचे किमान १० पर्याय सापडतील, जे त्यापेक्षा खूपच स्वस्त आहेत. या गोळ्या ८-१० रुपयांना विकत घेता येतील. त्याचप्रमाणे पॅन डीच्या १५ कॅप्सूलची किंमत १९९ रुपये आहे आणि त्याच फॉर्म्युल्यासह दुसऱ्या औषधाच्या १० कॅप्सूल केवळ २२ रुपयांना विकत घेता येतील.

**केंद्र सरकारचा वाटा महत्त्वाचा**

भारतातील औषधांची किंमत ही इतर वस्तूंप्रमाणे मागणी आणि पुरवठा यावर अवलंबून असते. मात्र, ३३ टक्क्यांहून अधिक औषधांच्या किमतींवर सरकारचे नियंत्रण आहे. म्हणजेच या औषधांच्या किमती मनमानी वाढवता येणार नाहीत. नॅशनल फार्मास्युटिकल प्राइसिंग ॲथॉरिटी (NPPA) ने अत्यावश्यक औषधांची यादी तयार केली आहे आणि त्यांच्या किमतींवर नियंत्रण ठेवले आहे. ड्रग प्राइस कंट्रोल ऑर्डर (DPCO) अंतर्गत ३५५ औषधांच्या आणि त्यांच्या ८८२ फॉर्म्युलेशनच्या किमती भारतात निश्चित केल्या गेल्या आहेत.

# डोळ्यात कचरा गेल्यावर करा 'हे' उपाय

डोळे हे मानवी शरीरातील एक महत्त्वाचे ज्ञानेंद्रिय. डोळे हा अतिशय महत्त्वाचा आणि नाजूक अवयव असल्यामुळे त्याकडे विशेष लक्ष द्यावं लागतं. धूळ, माती, प्रदूषके यांच्यामुळे डोळ्यांना इजा पोहोचू शकते. वातावरणातील धूलिकण डोळ्यात गेल्यानंतर डोळ्यांची जळजळ होणे, त्यातून पाणी येणे, डोळ्यात खुपणे असे अनेक त्रास संभवतात. त्यामुळे घरातून बाहेर पडताना डोळ्याची विशेष काळजी घ्यावी लागते. अनेक वेळा प्रवासादरम्यान डोळ्यामध्ये माती किंवा कचरा जातो. अथक प्रयत्न केल्यानंतरही डोळ्यात गेलेला कचरा काढणं शक्य होत नाही. अशावेळी काही सोप्या पद्धतीने आपण डोळ्यात गेलेला कचरा काढू शकतो.

▮सुती कापड पाण्यामध्ये भिजवावे. या ओल्या कापडाने डोळ्यांच्या कडा हलक्याशा दाबाव्यात. फक्त हा दाब देत असताना डोळ्यामधील कोणत्याही जागेवर जोर पडणार नाही याकडे लक्ष द्यावे.

▮डोळ्यात धूळ गेल्यास डोळ्यावर हळूवार फुंकर मारावी.

▮डोळ्यांवर गार पाणी शिंपडावे किंवा एका बशीत पाणी घेऊन १-२ सेकंदासाठी त्यात डोळा उघडझाप करावा. हे करत असताना डोळ्यात पाणी जातं मात्र घाबरू नये.

▮डोळ्यात काही गेल्यावर त्या क्षणी डोळ्यांची उघडझाप करावी. जेवढ्या लवकर तुम्ही ही कृती कराल तेवढा डोळ्यातील कचरा दूर होण्याची शक्यता जास्त असते.

▮अनेक वेळा पापण्यांवर धूळ साचते, अशावेळी डोळ्याच्या वरच्या बाजूला असलेल्या पापण्या खालच्या पापण्यांवर ठेवाव्यात आणि डोळ्यांची हळूहळू उघडझाप करावी.



# केस आणि त्वचेसाठी औषधी तेल



**सध्या केसांच्या समस्या वाढताना दिसताहेत. प्रदूषणाचं प्रमाण वाढत असताना केस आणि त्वचेवर त्याचा स्पष्ट परिणाम दिसतो. मात्र केसांवर अधिक परिणाम दिसण्याची अनेक कारणं आहेत. सध्या केसांचं सौंदर्य आणि स्वच्छता राखताना अनेक रसायनयुक्त प्रसाधनांचा वापर वाढतोय. दर्जा न बघता खरेदी केलेली अशी प्रसाधनं केसांच्या मुळांनाच हात घालतात. तीव्र प्रसाधनांमुळे केसांची मुळं कमकुवत होतात, केसांचा पोत बिघडतो आणि तक्रारींची मालिका सुरू होते. यावर उपाय म्हणून आठवड्यातून एकदा किंवा दोनदा तेलाचा मसाज करणं हा पर्याय आहे. यामुळे केसांचं आरोग्य सुधारतं, त्याचप्रमाणे डोकेही शांत राहतं. पण केवळ तेल पुरेसं नाही. काही उपायानं हे तेल अधिक उपयुक्त बनवता येऊ शकतं.**



▮तिळाच्या तेलात मेथीदाणे भिजत घाला. आता हे तेल मंद आचेवर गरम होऊ द्या. तेल गार झाल्यावर गाळून मेथीदाणे बाजूला करा. आता हे तेल अधिक औषधी आणि परिणामकारक आहे.

▮केसांसाठी आवळ्याची उपयुक्तता आपण जाणतो. आवळे उकळवा. आता हे मऊसर आवळे कूकरमध्ये ठेवून चार-पाच शिट्या करा. आवळ्याचा गर निघेल. हा गर गाळून घ्या. आता या मिश्रणात हवं ते तेल एकत्र करा आणि अर्धा तास गरम करा. थंड झाल्यावर तेल बाटलीत भरून ठेवा. या तेलानं केलेला मसाज अधिक चांगला परिणाम देईल.

▮सुकलेला आवळा तेलात मिसळा. तेल उकळू द्या. थंड झाल्यावर आवळ्यासहित तेल बाटलीत भरा.

▮खोबरेल तेलात बदाम मिसळा आणि तेलाला चांगली उकळी येऊ द्या. उकळी आल्यानंतर तेलाचा रंग बदलेल. रंग बदलल्यावर तेल आचेवरून उतरवा आणि थंड झाल्यावर बाटलीत भरून ठेवा.

▮खोबरेल तेलात मेथीदाणे घालून चार-पाच दिवस तसेच ठेवा. त्यानंतर गाळून तेल बाटलीत घाला. हे तेल अधिक उपयुक्त झालेलं असेल.



# पंचकर्म म्हणजे काय?

**पंचकर्म ही आयुर्वेदाची एक वैशिष्ट्यपूर्ण चिकित्सा आहे. प्राचीन भारतीय शास्त्रज्ञांनी शोधून काढलेली ही उपचार पद्धती आहे. यामध्ये रोग बरा करण्यासाठी एखादे औषध देऊन शरीरातच तो रोग जिरवून न टाकता तो रोग शरीरातून बाहेर काढून टाकण्याचा प्रयत्न केला जातो. यामुळे रोग समूळ नष्ट होतो. अर्थात तो रोग पुन्हा डोके वर काढत नाही व रोग समूळ नष्ट होतो. अशा रीतीने रोग शरीरातून बाहेर काढून टाकण्याच्या प्रक्रियेला शोधन क्रिया म्हटले जाते. मात्र त्याचबरोबरच बृहन, लंघन, स्नेहन, रुक्षण, स्वेदन व स्तंभन हे सहा उपक्रमही केले जातात. परंतु पंचकर्म उपचारात वमन, विरेचन, बस्ती, नस्य व रक्तमोक्षण हे प्रमुख व अत्यंत महत्त्वाचे असे उपचार आहेत.**



**प्रत्येक** रुग्णाला हे पाचही उपचार केलेच पाहिजेत, असे आवश्यक नाही. रुग्णाची प्रकृती, आतापर्यंत झालेली मोठमोठी आजारपणे, वय, कुठला ऋतू सुरू आहे या सर्वांचा विचार करून वैद्य रुग्णाला नेमका कुठला उपचार द्यायचा हे ठरवतात. पंचकर्मामध्ये वात, पित्त आणि कफ या तीन दोषांचे शोधन करायचे असते.

वात, पित्त व कफ हे तीन दोष संतुलित असतील तर कोणताही रोग होत नाही. मात्र यांच्यापैकी एखादाही दोष वाढला असेल, तर शरीरात रोग निर्माण होत असतो. हे तीन दोष वाढण्याच्यादेखील वेगवेगळ्या श्रेणी असतात. त्यानुसार उपचार निश्चित केला जातो. साधारणतः अन्न पचन न होणे, तोंडाला चव नसणे, स्थूलपणा, ॲनिमिया, जडत्व, अंग गळून जाणे, अंगावर पित्त उठणे, सर्वांगास कंप सुटणे, सर्व अंग जखडणे, कामात लक्ष न लागणे, अतिशय आळस येणे, थोडे श्रम करताच दम लागणे, अकारण अशक्तपणा येणे, सर्वांगास दुर्गंधी येणे, वारंवार कफ होणे, वारंवार पित्त होणे, निद्रानाश किंवा अतिशय झोप येणे, नपुंसकता येणे, वाईट स्वप्ने पडणे, शरीराचा वर्ण काळवंडणे ही लक्षणे दिसली तर पंचकर्म उपचार देणे अतिशय लाभकारक असते.

पंचकर्म उपचार करताना रोग्याची शक्ती पाहिली जाते. हे उपचार सोसण्याची ताकद रुग्णामध्ये असली पाहिजे. वात, कफ व पित्त हे तीन दोष शरीरात



वाढले असतील. सर्व शरीरात पसरले असतील व ते साम अवस्थेत असतील तर ते दोष वाढलेले असूनदेखील पंचकर्माद्वारे तसेच्या तसे बाहेर काढता येत नाहीत. साम अवस्थेतील रोग्याचे शोधन केल्यास रोग्याला अधिक त्रास होण्याची शक्यता असते. यासाठी पाचन, स्नेहन व स्वेदन हे तीन पूर्व उपचार केले जातात व तद्नंतर पंचकर्म उपचार केले जातात.

वैद्यांनी सांगितलेले पथ्य व इतर सूचनांचे पालन करणे शक्य नसेल, तर पंचकर्म करू नये आणि स्वतःच्या मनाने तर अजिबात करू नये. पंचकर्म उपचारांचा अधिकाधिक लाभ व्हावा म्हणून काही सूचना लक्षात ठेवल्या पाहिजेत.

अतिशय मोठ्या आवाजात बोलू नये. कुठल्याही वाहनाने प्रवास करू नये. जास्त चालू-फिरू नये. एकाच जागी जास्त बसून वा पडून राहू नये, अति खाणे किंवा अजीर्ण टाळावे. वैद्यांनी सांगितलेलाच आहार घ्यावा आणि ब्रह्मचर्याचे पालन करावे.

पंचकर्माने रोग शरीरातून समूळ नष्ट होतो. परंतु काही इतरही याचे फायदे आहेत. शरीरात अग्नी प्रदिप्त होतो. शरीराला व मनाला स्वस्थता मिळते. इंद्रिये प्रसन्न होतात. मन व बुद्धी आपापल्या कार्यांमध्ये उत्कर्ष करतात. शरीराचा वर्ण व कांती उजळते. त्वचा तजेलदार दिसू लागते. कार्यशक्ती म्हणजे स्टॅमिना वाढतो. शरीर पुष्ट व भारदार होते. वृद्धावस्था लवकर येत नाही. संतती नसलेल्यांना संततीप्राप्ती होते. निरोगी अवस्थेत दीर्घायुष्य मिळते. पंचकर्म उपचार तज्ज्ञाच्या मार्गदर्शनाखालीच घ्यावा, त्याने दुष्पपरिणाम होत नाहीत. हे सर्व फायदे मिळवायचे असतील तर पंचकर्म उपचार वर्षातून किमान एकदा तरी करून घेतलाच पाहिजे.

# पावसाळ्यात पाणी पिताना अशी घ्या काळजी...

**दूषित पाण्यातून पावसाळ्यात आणि एरवीही अनेक आजार पसरतात. विशेषतः पावसाळ्यामध्ये घरात अशुद्ध पाणी येण्याची शक्यता जास्त असते. त्यामुळे कावीळ, गॅस्ट्रो, कॉलरा, डायरिया असे आजार उद्भवतात. या आजारांपासून लांब राहण्यासाठी पाणी निर्जंतुक व स्वच्छ असणे गरजेचे आहे. ज्या ठिकाणी २४ तास पाणी उपलब्ध नसते, तिथे तर हे उपाय जास्तच फायदेशीर ठरतात. तेव्हा घरच्या घरी पाणी स्वच्छ करण्याच्या काही खास पद्धती...**

**पाणी गाळून घेणे**

वॉटर प्युरिफायरमध्ये पाणी गाळले जाते. त्याचप्रमाणे स्वच्छ कापड किंवा अतिशय बारीक जाळीची गाळणीने पाणी गाळून घेतल्यास ते स्वच्छ होते. त्यामुळे पावसाळ्याच्या दिवसात या पद्धतीचा हमखास वापर करावा. मी चांगल्या सोसायटीमध्ये राहतो, त्यामुळे आमच्याकडे चांगले पाणी येते, असे वाटत असले तरीही पाणी कायम गाळून मगच प्यावे.



**उकळणे**

पाण्याच्या दोन प्रकारच्या दुष्टीपासून आपण आपली काळजी घेतली पाहिजे. भौतिकदृष्ट्या पाणी दुष्ट होते ते म्हणजे कचरा, माती, गाळ इत्यादी आणि जीव-जंतूंनी पाणी दुष्ट होते. हा अतिशय धोकादायक प्रकार. भौतिक दुष्टी आपण पाणी गाळून, तुरटी फिरवून घालवू शकतो, पण जीवजंतूंच्या दुष्टीमध्ये पाणी उकळून घेणे जास्त सोयीस्कर आहे. उकळल्यामुळे पाण्यातील जीवजंतू मरून जातात आणि पाणी शुद्ध होते. लहान मुलांपासून ज्येष्ठांपर्यंत कुटुंबातील सर्वांनी उकळलेले पाणी प्यावे. (पाण्याला उकळी फुटल्यानंतर पाणी १०-१५ मिनिटे उकळावे. नंतरच गॅस बंद करावा. पाणी पुरेसे उकळणे गरजेचे आहे.)

**तुरटी फिरवणे**

तुरटी फिरवून पाणी शुद्ध करणे ही अतिशय पारंपरिक पद्धत आहे. भरलेल्या पाण्याच्या भांड्यात तुरटी फिरवल्यास पाण्यातील गाळ खाली बसतो आणि पाणी स्वच्छ होते. मात्र तुरटी फिरवली असली तरीही हा पाणी स्वच्छ करण्याचा म्हणावा तितका खात्रीशीर उपाय नसल्याने हे पाणी गाळून आणि उकळूनच प्यावे.

**नळाला फिल्टर बसवणे**

पावसाळ्याच्या दिवसात नळाला काहीसे मातकट आणि अशुद्ध पाणी येते. त्यामुळे हे पाणी भरतानाच काही प्रमाणात स्वच्छ व्हावे यासाठी नळाला कापड बांधावे किंवा गाळणे लावावे. याशिवाय हल्ली बाजारात नळाला लावण्यात येणारे वेगवेगळे फिल्टर्स उपलब्ध असतात. त्यांचा वापरही फायदेशीर ठरू शकतो. यामुळे पाण्यातील सौम्य प्रकारच्या जंतूंचा धोका कमी होण्यास मदत होते.

# एसटी प्रवाशांना १५ टक्के सवलत

## जुलैपासून आरक्षण करणाऱ्यांसाठी योजना कार्यान्वित होणार

■**मुंबई :** कमी गर्दीच्या हंगामामध्ये प्रवाशांची संख्या वाढावी या उद्देशाने लांब पल्ल्याच्या प्रवासादरम्यान आगाऊ आरक्षण करणाऱ्या प्रवाशांना तिकीट दरामध्ये १५ टक्के सवलत देण्याची घोषणा परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी आज केली. ही योजना येत्या जुलैपासून कार्यान्वित होणार आहे. याचा फायदा ई-शिवनेरीसारख्या बसने प्रवास करणाऱ्या अनेक लोकांना होणार आहे.

एसटीच्या ७७व्या वर्धापन दिनानिमित्त यशवंत नाट्य मंदिर येथे आयोजित केलेल्या नावीन्यपूर्ण योजनांचा शुभारंभ आणि गौरव पुरस्कार सोहळ्यात ते बोलत होते. या वेळी एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय डॉ. माधव कुसेकर एसटीचे वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

सरनाईक म्हणाले की, गेली ७७ वर्ष ऊन, वारा पाऊस याची तमा न बाळगता चांद्यापासून बांद्यापर्यंत आणि गाव खेड्यापासून आदिवासी पाड्यापर्यंत समाजातील सर्व घटकांना सातत्याने प्रवासी सेवा देण्याचे काम एसटीने अविरतपणे केलेल आहे. भविष्यात एसटी आपला शतकोत्तर महोत्सव निश्चित पूर्ण करेल! कारण महाराष्ट्रातल्या सर्व सामान्य जनतेचा आशीर्वाद आणि पाठबळ एसटीला मिळालेल आहे.

७५ वर्षांपेक्षा जास्त काळ टिकून राहिलेल्या खूप कमी संस्था देशात अस्तित्वात आहेत. एसटी महामंडळ त्यापैकी एक आहे. आज ७७ वर्षानंतर देखील महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनातील एसटीचे महत्त्व यत किंचितही कमी झालेले नाही. त्यामुळे ''लोकाश्रय'' लाभलेली आपली एसटी भविष्यात अशीच मार्गक्रमण करत राहील, असा मला विश्वास वाटतो.

भविष्यात दळणवळण क्षेत्रात होणारे संभाव्य बदल लक्षात घेता प्रवाशांना अधिक सुरक्षित आणि स्वच्छ अशी ''स्मार्ट एसटी'' उपलब्ध करून देण्याचा आपला मानस आ-हे, असे प्रतिपादन मंत्री सरनाईक यांनी यावेळी केले.

'बस फॉर अस' या एसटीप्रेमी संस्थेने तयार केलेले गेल्या ७७ वर्षातील एसटीचा प्रवास चित्रमयरित्या दाखवण्यात आलेले एसटीचा वाहननामा हे कॉफी टेबल पुस्तक प्रकाशित करण्यात आले. एसटीतील सर्वोत्कृष्ट अधिकाऱ्यांचा ''अध्यक्ष सुवर्णपदक'' देऊन गौरव करण्यात आला. त्यामध्ये धुळे - नंदुरबार विभागाचे विभाग नियंत्रक विजय गीते साक्री आगाराचे आगार व्यवस्थापक सुनील महाले, धुळे - नंदुरबार विभागाचे यंत्र अभियंता पंकज महाजन, जालना विभागाचे यंत्र अभियंता सुरेंद्र तांदळे व सिंधुदुर्ग विभागाचे स्थापत्य अभियंता अक्षय केंकरे यांचा सुवर्ण पदक व प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला.

प्रवाशांना दर्जेदार सुविधा देण्याबरोबरच कर्मचाऱ्यांनादेखील आर्थिकदृष्ट्या सक्षम करणाऱ्या एसटीला देशातील क्रमांक एकची परिवहन संस्था निर्माण करणे हेच ध्येय असल्याचे सरनाईक म्हणाले.

### एसटीच्या बदल्या आता ऑनलाइन

बदली प्रक्रियेमध्ये पारदर्शकता यावी आणि सेवा जेष्ठतेनुसार कर्मचाऱ्यांच्या बदल्या व्हाव्यात. तसेच मानवी हस्तक्षेप पूर्णपणे थांबवा या उद्देशाने एसटीच्या सर्व बदल्या या ऑनलाइन पद्धतीने करण्याची घोषणा मंत्री सरनाईक यांना केली होती. त्या योजनेचे अनावरण आज त्यांच्या हस्ते करण्यात आले. आंतर प्रादेशिक, प्रदेशांतर्गत व विभागांतर्गत होणाऱ्या सर्व बदल्या यापुढे ऑनलाईन पद्धतीने होणार आहेत. या बरोबरच विना अपघात सेवा बजावणाऱ्या चालकांच्या प्रोत्साहन योजनेची शुभारंभ तसेच राज्य शासनाचा विश्वकर्मा कामगार पुरस्कार प्राप्त कर्मचाऱ्यांचा सत्कार मंत्री सरनाईक यांच्या हस्ते करण्यात आला.



## पासपोर्ट नूतनीकरणासाठी 'क्लिअरन्स सर्टिफिकेट' देण्याचा न्यायालयाचा आदेश



■**मुंबई :** पाठलाग प्रकरणातील एका आरोपीला त्याचा पासपोर्ट नूतनीकरणासाठी क्लिअरन्स सर्टिफिकेट (स्वीकृती प्रमाणपत्र) देण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने शहर पोलीस आणि पासपोर्ट विभागाला दिले. शिक्षणासाठी कॅनडाला जाण्यासाठी आवश्यक क्लिअरन्स सर्टिफिकेट मिळावे यासाठी या आरोपीने याचिका दाखल केली होती. न्या. जी. एस. कुलकर्णी आणि अद्वैत सेठना यांच्या खंडपीठाने मागील महिन्यात दिलेल्या आदेशात म्हटले आहे की, कोर्टाने परदेश प्रवासास परवानगी दिली असताना पोलिसांनी क्लिअरन्स सर्टिफिकेट द्यायला हवे होते. याचिकाकर्त्याने नमूद केले की, कनिष्ठ दंडाधिकारी न्यायालयाने त्याला पासपोर्ट नूतनीकरणासाठी परवानगी दिली आहे. तसेच एप्रिल २०२५ मध्ये उच्च न्यायालयाच्या एकल खंडपीठाने त्याला त्याच्या अभ्यासक्रमाच्या कालावधीत परदेश प्रवास करण्याची परवानगी दिली होती, असे-ही याचिकेत नमूद केले. न्यायालयाने आदेशात म्हटले की, नव्हेंबर २०२४ मध्ये पासपोर्ट नूतनीकरणास परवानगी देणारा आदेश मजिस्ट्रेट कोर्टाने दिला असताना, पोलिसांनी नकारात्मक अहवाल देणे योग्य नव्हते.

# 'शून्य कचरा' संकल्पनेचा उल्हासनगरमध्ये बोजवारा

## डम्पिंग ग्राऊंड ओव्हरफ्लो, कोट्यवधींचा ठेका, पण स्वच्छतेचा पत्ता नाही!

■**उल्हासनगर :** 'शून्य कचरा शहर' ही घोषणा करणाऱ्या उल्हासनगर महानगरपालिकेचे प्रत्यक्ष चित्र अत्यंत विरोधाभासी आणि धक्कादायक आहे. खडीमशीन डम्पिंग ग्राऊंड क्षमतेपलीकडे भरल्यामुळे आता तिथून कचरा ओसंडून वाहत आहे, तर दुसरीकडे शहरभर दुर्गंधी, घाण आणि ढीग साचल्याने नागरिक त्रस्त आहेत. लाखो रुपयांची जाहिरात, कोट्यवधींचा कचरा व्यवस्थापन ठेका आणि तरीही गल्लीगल्लीत साचलेला कचरा... हा विरोधाभास आता लोकांच्या नजरेत येऊ लागला आहे.

उल्हासनगरच्या खडीमशीन परिसरातील डम्पिंग ग्राऊंडवर सध्या इतका मोठा कचऱ्याचा साठा झाला आहे की, वाहनांना प्रवेश देखील अवघड होऊ लागला आहे. ठेकेदार कोणार्क एन्व्हायर्नमेंट कंपनीकडून डम्पिंग साइट-वर अत्यंत धीम्या गतीने प्रक्रिया केली जात असून, दररोज निर्माण होणाऱ्या सुमारे ४०० मॅट्रिक टन कचऱ्याची विल्हेवाट लावली जात नाही. त्यामुळे शहरात इतरत्र कचऱ्याचे ढीग



### चौकशी करण्याची कार्यकर्त्यांची मागणी

या परिस्थितीवर अनेक सामाजिक कार्यकर्ते आणि स्थानिक रहिवाशांनी संतप्त प्रतिक्रिया देत, ठेकेदार कंपनी आणि प्रशासन यांच्यावर चौकशीची मागणी केली आहे. ह्यकरोडो रुपये खर्चूनही जर शहर घाणीत रुतले असेल, तर जबाबदारी निश्चित व्हायलाच हवीह्व अशी संतप्त भावना व्यक्त केली जात आहे.

उभे राहत आहेत.

उल्हासनगर शहरातील कॅम्प ४ आणि ५ हे भाग कचऱ्याचे 'हॉटस्पॉट' ठरत असून, रस्त्यांच्या कडेला ढीग पडले आहेत. उग्र वास, डासांचा त्रास आणि अस्वच्छतेमुळे नागरिक हैराण झाले आहेत. काही ठिकाणी तर रस्त्यावरून चालणेही कठीण झाले आहे. घंटागाड्यांचे वेळेवर न येणे, नियमित उचल न होणे आणि विल्हेवाट न लावणे या त्रिसूत्रीने परिस्थिती बिघडली आहे.

**जमिनीवर ढीगच ढीग!**

शहरभर जाहिरात फलकांवर ह्यस्वच्छ उल्हासनगर, सुंदर उल्हासनगरह्वच्या घोषणा झळकत असल्या तरी प्रत्यक्षात रस्त्यावर आणि गल्लीगल्लीत फक्त कचराचे साम्राज्य आहे. हे दृश्य पाहून नागरिक विचारू लागले आहेत. शहराला स्वच्छतेचा मुखवटा चढवून खरे चित्र लपवले जातेय का?

**कोट्यवधींचा ठेका...आणि शून्य परिणाम?**

महानगरपालिकेने 'शून्य कचरा' संकल्पना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी कोट्यवधी रुपयांचा ठेका कोणार्क कंपनीला दिला आहे. मात्र या ठेक्यातील कार्यक्षमतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. कचरा व्यवस्थापनात अपयश असूनही महापालिका प्रशासन गप्प का? असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

# मुंबई शिक्षण उपसंचालकांविरोधात शिक्षकांचा जेलभरो

■**मुंबई :** मुंबई विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय आणि त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांमधील अनियमितता, प्रलंबित कामे, भ्रष्टाचार याची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याच्या मागणीसाठी मुंबई विभागीय कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटनेने आक्रमक भूमिका घेतली आहे. विविध मागण्यांसाठी १३ जून रोजी जेलभरो आंदोलन करण्याचा निर्णय संघटनेने घेतला आ-हे. याबाबतची सूचना शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्यासह विविध अधिकाऱ्यांना देण्यात आल्याचे संघटनेचे सचिव प्रा. मुकुंद आंधळकर यांनी सांगितले. शिक्षकांच्या मागण्यांबाबत मुंबई विभागीय कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटनेने शिक्षण उपसंचालक यांची भेट घेतली होती. सेवेतील शिक्षकांना सेवेतून कमी करून नवीन शिक्षकाला नियुक्ती दिली जात असल्याबाबतच्या तक्रारीचे निराकरण करण्याकडे उपसंचालक कार्यालयाने दुर्लक्ष केल्याचा आरोप करण्यात आला आहे. शिक्षकांची संख्या कमी करणे, सेवेतील शिक्षकाला उचित लाभ न देणे अशा प्रकारामुळे शिक्षकांमध्ये असंतोष पसरला असून याविरोधात आता आंदोलन करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.



### शिक्षकांकडून करण्यात आलेल्या मागण्या

- अनियमितता, समस्यांच्या निराकरणात होणारा विलंब, अल्पसंख्यांक संस्थांमधील भरतीमधील भ्रष्टाचार दूर करावा
- मुंबई विभागातील सर्व प्रलंबित नियुक्ती मान्यता तातडीने द्यावा
- नियम डावलून केलेल्या सर्व संचमान्यता सुधारण्यात याव्यात
- सर्व प्रलंबित वेतन देयके विनविलंब मंजूर करावीत
- सर्व शिक्षकांचे वेतन दरमहा एक तारखेला करावेत
- २०१२ मध्ये नियुक्त केलेल्या नियुक्ती दिनांकापासून मान्यता देण्यात यावी.

# शहरातील वीज कर्मचाऱ्यांची सुरक्षा वाऱ्यावर

■**वसई :** विरारमधील अर्नाळा येथे वीज दुरुस्तीच्या कामादरम्यान महावितरणच्या कर्मचाऱ्यांना विजेचा धक्का लागल्याचा प्रकार घडला आहे. यात एकाच मृत्यू झाला होता. या दुर्घटनेनंतर कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. अनेक ठिकाणच्या भागात महावितरणचे कर्मचारी सुरक्षा साधनाविनाच दुरुस्तीची कामे करीत असल्याने एकप्रकारे या कर्मचाऱ्यांची सुरक्षा वाऱ्यावर असल्याचे चित्र दिसून येत आहे. वसई- विरार शहरात महावितरणकडून वीज पुरवठा केला जातो. शहराच्या वाढत्या नागरिकरणामुळे शहरात विजेची मागणी ही अधिक वाढली आ-हे. त्यामुळे वितरण व्यवस्थेवर अतिभार येऊ लागला आहे. अशावेळी वितरण व्यवस्थेत तांत्रिक अडचण निर्माण होते. विशेषतः पावसाळ्यात तर अधिकच वीज समस्या निर्माण होत असतात. वीज समस्या निर्माण झाल्यानंतर त्या दुरुस्तीची कामे शासकीय कर्मचाऱ्यांसोबतच खासगी एजन्सीकडून नियुक्त केलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांकडून करवून घेतली जातात. मात्र, वीज दुरुस्तीचे काम करताना त्यांना आवश्यक ती सुरक्षा साधने उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. मात्र अनेकदा महावितरणचे वीज दुरुस्ती करणारे कर्मचारी सुरक्षा साधनाविनाच दुरुस्तीची कामे करीत असल्याचे चित्र दिसून येत आहे. शुक्रवारी अर्नाळा येथे रोहित्राच्या दुरुस्तीच्या कामादरम्यान महावितरणच्या कर्मचाऱ्यांना विजेचा धक्का लागल्याची घटना घडली यात एका वीज कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला आहे. या घटनेनंतर पुन्हा महावितरणच्या कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न उपस्थित केला जात आहे. कर्मचाऱ्यांना सुरक्षा साधने उपलब्ध करून देऊन त्यांना त्याचे प्रशिक्षण देण्यात यावे अशी मागणी ही आता जोर धरू लागली आहे.



"पावसाळापूर्व एमएसईबीच्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाते. कोणत्या पद्धतीने विद्युत विभागाच्या साहित्यांची हाताळणी करावी? कसे ते वापरावे? याची माहिती दिली जाते. वषार्काठी हे प्रशिक्षण भरवले जाते."

**-आलोक करंडे - अतिरिक्त कार्यकारी अभियंता**

### 'या' भागाला अधिक महत्त्व

बकरी ईदनिमित्त जनावरे खरेदी करण्याचा बाजार येथील अवचितपाडा आणि खंडुपाडा येथे दरवर्षी भरत असतो, तर या जनावरांना खाण्यासाठी लागणाऱ्या चाऱ्याचा बाजार शहरातील तीनबत्ती, कोटरगेट, चांदतारा मस्जिद, दगारीड आणि वंजारपट्टी नाका येथे भरत असतो. या ठिकाणी ग्रामीण भागातील चिंबीपाडा, मीठपाडा, आनगाव, पाये आदी ठिकाणांहून आदिवासी गवत, पेंढा आणि झाडांचा पाला आणून येथे विकतात.

# भिवंडी शहरात बकरी ईद सणाचा आदिवासींना आधार... गवत-पाला विकून मिळवितात रोजगार

■**भिवंडी :** मुस्लिम बहुल भिवंडी शहरात इस्लाम धर्मीयांचा बकरी ईद सण याच आठवड्यात, ७ जूनपासून साजरा होणार आहे. प्रत्येक सण हा कुणासाठी श्रद्धेचा, तर कुणासाठी आर्थिक उत्पन्नाचा स्त्रोत ठरतो. भिवंडीतील बकरी ईद सणही असाच एक सण असून, तो ग्रामीण भागातील आदिवासी बांधवांसाठी विशेषतः आर्थिकदृष्ट्या आधारस्तंभ ठरत आहे.

भिवंडीत मोठ्या संख्येने इस्लाम धर्मीय लोक राहत असून बकरी ईद निमित्ताने हजारोंच्या संख्येने बोकड आणि रेडे यांची कुर्बानी दिली जाते. त्याकरिता १५ दिवस अगोदर बोकड आणि रेड्यांची खरेदी करीत घरी आणतात. त्यांची सेवा करून ईदच्या दिवशी कुर्बानी दिली जाते. या दरम्यान शहरात बोकड, रेड्यांच्या चाऱ्यासाठी लागणारा गवत, पेंढा आणि झाडांचा पाला विकून आदिवासी समाज आपली आर्थिक चणचण दूर करण्याचा प्रयत्न करत असतात.



सध्या शहरातील गल्लीबोळात व मोहल्ल्यात जनावरांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही या ठिकाणी दिवसेंदिवस ग्राहकांची संख्या वाढत आहे, त्यामुळे चाऱ्याच्या विक्रीत वाढ होत आहे. शहरातील जनावरांच्या खुल्या बाजारात ५० रुपयेप्रमाणे भाताच्या पेंढ्याची एक जुडी (मोदल) विकली जात आहे. तसेच कोटरगेट परिसरातील चांदतारा मस्जिद जवळ १० ते २० रुपये जुडीप्रमाणे गवत, भाताचा पेंढा, शिदाचा आणि उंबराच्या झाडाचा पाला आ-दिवासी बांधव गेल्या काही दिवसांपासून विकत असून या पैशातून मिळणाऱ्या रोजगारातून उदरनिर्वाह करीत आहेत. मुस्लिम धर्मीयांच्या बकरी ईद या सणामुळे आदिवासींना चांगलेच उत्पन्न प्राप्त होत आहे. त्यामुळे सण कोणत्याही धर्माचा असो तो अनेकांना रोजगार देऊन जात असल्याचे चित्र मोठ्या प्रमाणात पहावयास मिळत आहे.

# भाईंदरमध्ये परदेशी नागरिकाला फ्लॅट भाड्याने दिल्याची माहिती लपवली

■**भाईंदर :** मिरारोड पूर्वेच्या काशीगाव पोलीस ठाणे हद्दीत असलेल्या फ्लॅट मालकाने परदेशी नागरिकाला भाड्याने सदरील फ्लॅट हा भाड्याने दिला होता. परदेशी नागरिकाला फ्लॅट भाडयाने दिल्यानंतर त्याची माहिती स्थानिक पोलीस ठाण्यास देणे बंधनकारक आहे. असे असताना याबाबत पोलिसांनी कोणतीही माहिती दिली नसल्याने फ्लॅट मालका विरोधात काशीगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. काशीगाव पोलीस ठाणे हद्दीत फ्लॅटचे मालक जमिला पाशा खान यांनी त्यांच्या नावे असलेला फ्लॅट परदेशी नागरिकाला जानेवारी २०२५ मध्ये भाड्याने दिला होता. फ्लॅटमध्ये ठेवलेल्या परदेशी नागरिक भाडेकरुची जानेवारी २०२५ पासून अद्यापपर्यंत पोलीस ठाण्याला माहिती दिली नाही. रुम मालक यांनी भारतीय नागरी सुरक्षा संहिता कायद्याचे उल्लंघन केले. तसेच पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांनी जारी केलेल्या मनाई आदेशाची अवहेलना केली. तसेच परदेशी नागरिक यांना अनधिकृतपणे सदनिका भाडे तत्वावर देवून, भाडेकरुची माहिती सी फॉर्म प्रमाणे ऑनलाईन व समक्ष स्थानिक पोलीस ठाण्यास २४ तासाच्या आत कळविणे बंधनकारक असताना ती हेतुपुर्वक कळविली नाही,अशी तक्रार आहे.



त्यामुळे भारतीय न्याय संहिता कायद्याचे कलम २२३ रिपोर्ट टु पोलीस ऑर्डर नियमाप्रमाणे फ्लॅट मालक जमीला पाशा खान यांच्या विरोधात पोलीस पोलीस अंमलदार सुनिल ठाकूर यांच्या फियार्दीवरून काशीगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश तोगरवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार प्रकाश माने हे करत आहेत.

# शेअर्स खरेदी करण्यास सांगून फसवणूक

■**भाईंदर :** मिरारोड पूर्वेच्या नयानगर येथे राहणांया व्यक्तीला अनोळखी मोबाईल धारकांनी संपर्क करून शेअर्स खरेदी केल्यास मोठ्या प्रमाणात नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवले. या अमिषाला बळी पडून ३० लाख ४० हजाराची गुंतवणूक करून फसवणूक केली आहे. याप्रकरणी नयानगर पोलीस ठाण्यात तीन अनोळखी मोबाईल धा-रकांविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नयानगरमध्ये राहणारे ईफत अझर सय्यद इव्हेन्ट मॅनेजमेंन्टचा व्यवसाय करता. त्यांना युबीएस या पेजधारकाने तसेच अनोळखी मोबाईल धारक प्रिशा शुक्ला आणि मोबाईल धारक डॅनियल यांनी मोठ्या प्रमाणात नफा देण्याचे बहाण्याने त्यांनी वेगवगळ्या कंपनीचे शेअर्स खरेदी करण्यास भाग पाडले. त्यांना वेगवेगळ्या बँक खात्यावर २८ एप्रिल ते २६ मे पर्यंत ३० लाख ४० हजार रुपये ऑनलाईन पाठवले. त्यानंतर गुंतवणूक केलेली रक्कम परत मिळाली नाही. याप्रकरणी त्या अनोळखी तीन जणांच्या विरोधात भारतीय न्याय सहितेचे विविध कलमासह माहिती तंत्रज्ञान अधिनियम विविध कलमा अंतर्गत नयानगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस निरीक्षक राजेंद्र खेडकर हे करत आहेत.

# अल्पवयीन मुलीवर बलात्कार केला आणि पळून गेला

■**मुंबई :** मुंबईतील विक्रोळी परिसरात एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलीवर खिडकीतून घरात शिरून बलात्कार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. ही घटना शुक्रवारी ३० मे रोजी घडली. या प्रकरणात पोलिसांनी तपास करून ३१ वर्षीय समीर शेख या आरोपीला अटक केली आहे. ही अटक तांत्रिक पुरावे आणि परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे करण्यात आली असून, आरोपीविरोधात पोस्को कायद्यासह बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



ही घटना विक्रोळीच्या पाकसाईट पोलीस स्टेशनच्या हद्दीत घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी समीर शेख याने काही दिवसांपूर्वी रात्रीच्या सुमारास संबंधित अल्पवयीन मुलीच्या घरात कोणीही नसताना खिडकी फोडून आत प्रवेश केला आणि तिच्यावर बलात्कार केला. नंतर घटनास्थळावरून पलायन केले. मुलीच्या कुटुंबीयांनी तत्काळ पोलिसांकडे तक्रार दाखल केली.

पोलिसांनी त्वरित तपासाला सुरुवात करत परिसरातील सीसीटीव्ही फुटेज मिळवले आणि तांत्रिक माहितीच्या आधारे आरोपीचा शोध घेतला. अखेर शुक्रवारी आरोपी समीर शेखला अटक करण्यात आली.

सध्या आरोपी पोलीस कोठडीत असून, त्याच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीचीही तपासणी केली जात आहे. पोलिसांनी या प्रकरणात पुढील तपास सुरू केला असून, लवकरच न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले जाणार आहे.

# सनई चौघडे वाजले तिथे दुसऱ्याच दिवशी मातम

## अंगावरची हळद उतरण्याआधीच नवरीचा मृत्यू, धक्क्याने बापही दगावला

■**सोलापूर :** लग्न ठरणं हा कोणत्याही व्यक्तीच्या आयुष्यातील अतिशय महत्वाचा आणि आनंदाचा क्षण असतो. आपल्या होणाऱ्या जोडीदारासोबत भावी आयुष्याची स्वप्न रंगवणं सगळ्यांनाच आवडतं. लग्न ठरल्यावर सोलापूरच्या जानकीनेही अशीच स्वप्न रंगवली होती. पण ती क्षणभुंगर ठरली कारण लग्नाच्या दुसऱ्याच दिवशी अं काही घडलं की जिथे लग्न लागलं होतं, त्याच घरावर शोककळा पसरली, दुःखाचे विलाप ऐकू येऊ लागले, लोकांच्या डोळ्यातलं पाणीच खळेना.

हातावरची मेंदी, चुड्याने भरलेलं मनगट, हळकुंड, लग्नाची लागलेली हळद.. सगळं सगळं तिथेच सोडून, एका दिवसापूर्वी लग्न लागलेली जानकी सर्वांना सोडून गेली. तिच्या जाण्याने पतीसह सासरच्यांना तर धक्का बसलाच पण तिच्या माहेरच्यांवर तर दुःखाचा डोंगरच कोसळला. काल जिची साश्रूनयनांनी, पण समाधानाने सासरी पाठवणी केली, त्याच मुलीच्या मृत्यूच्या बातमीने गळगुंडे यांच्या घरात शोककळा पसरली.

मात्र गळगुंडे यांच्या दुःखाचे दिवस अजूनही सरलेच नाहीत. कारण जानकीच्या मृत्यूचा तिच्या वडिलांनाही सर्वात मोठा धक्का बसला. नुकतंच लग्न झालेल्या, संसारातून उठून गेलेल्या लेकीच्या मृत्यूने तिचे वडील बाळासाहेब गळगुंडे हे शोकविव्हल झाले आणि मुलीच्या मृत्यूच्या १० व्या दिवशीच त्यांनीही अखेरचा श्वास घेतला. जानकीच्या १० व्या चे विधि पार पडले आणि तेव्हाच बाळासाहेब गळगुंडे यांनाही हृदयविकाराचा तीव्र झटका आला आणि क्षणात कोसळले. त्यांनी तेथेच अखेरचा श्वास घेतला. आधी लेक, नंतर घरचा कर्ता पुरुष पाठोपाठ ल्यामुळे त्यामुळे त्यांच्या कुटुंबात तर हाहाकार उडाला.

मुलीवचर बापाचं जीवापाड प्रेम असतं.. याचं मूर्तीमंत उदाहरण म्हणजे ही घटना असल्याचे मत अनेतकांनी व्यक्त केले असून मुलीपाठोपाठ वडिलांनचाही मृत्यू झाल्याने माढ्यातील गावकरी हळहळले आहेत.

### नेमकं झालं तरी काय?

१३ मे रोजी माढा तालुक्यातील घोटी येथील बाळासाहेब गळगुंडे यांची मुलगी जानकीचा माळशिरस तालुक्यातील बाभूळगाव येथील समीर पराडे याच्याबरोबर विवाह झाला. अक्षता पडल्या, सप्तपदी झाल्या आणि समीरसोबत सुखी संसाराची स्वप्न रंगवत जानकीने पराडेंकडे गृहप्रवेशही केला. मात्र दुसऱ्याच दिवशी आक्रीत घडलं. लग्नाच्या दुसऱ्या दिवशीच सकाळी जानकीच्या छातीमध्ये दुखू लागलं, तिला तातडीने अकलूज येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यासाठी नेण्यात येत होतं मात्र रस्त्यातच घात झाला आणि जानकीचा मृत्यू झाला.



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००0१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com